दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

दिपावली पाडवा
बलिप्रतिपदा

नवा गंध, नवा वास,
नव्या रांगोळीची नवी आरास!
स्वप्नातले रंग नवे,
आकाशातले असंख्य दिवे,
दिवाळी पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा!

Happy Diwali

❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : ३१५ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

सतेज पाटलांचा संघर्ष मोर्चा

गोकुळमधील शासननियुक्त सदस्यांच्या निर्णयाला काँग्रेसचा विरोध, मविआच्या घटक पक्षांचा मोर्चाला पाठिंबा

■ कोल्हापूर (दै. संध्या)

कोल्हापूरच्या राजकीय आणि सहकार क्षेत्रातील सर्वात प्रतिष्ठेच्या 'गोकुळ' दूध संघाच्या अध्यक्ष निवडीवरून आता मोठा संघर्ष पेटला आहे. गोकुळ दूध संघात सतेज पाटील गटाला बहुमत मिळालेले असताना, राज्य सरकारने अध्यक्ष निवडीसाठी अतिरिक्त ४ शासन नियुक्त संचालकांच्या वाढीचा अध्यादेश काढला आहे. या निर्णयामुळे अध्यक्षपद महायुतीकडे जाण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. सरकारच्या या हस्तक्षेपाविरोधात काँग्रेस आमदार सतेज पाटील यांच्या 'समविचारी आघाडी'ने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली असून, आज कोल्हापुरात भव्य 'संघर्ष मोर्चा'ची हाक दिली आहे. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात येणारा हा संघर्ष मोर्चा कोल्हापूरच्या दसरा चौकातून सुरू झाला आहे. तेथून हा मोर्चा थेट जिल्हाधिकारी



कार्यालयावर धडकला आहे. शासनाने लोकशाही प्रक्रियेत आणि सहकार क्षेत्रात बेकायदेशीर हस्तक्षेप करून जनमताचा अनादर केल्याचा आरोप या मोर्चामधून करण्यात येत आहे.

गोकुळ दूध संघावरील या कारवाईच्या विरोधात महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांनी, विशेषतः संजय राऊत, विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांनी यापूर्वीच सरकारवर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. आता सतेज पाटील यांच्या या संघर्षाला महाविकास आघाडीच्या घटक पक्षांनीही पूर्ण पाठिंबा जाहीर केला आहे. मोर्चात काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटाचे सर्व प्रमुख स्थानिक नेते, कार्यकर्ते आणि गोकुळ दूध संघाशी संबंधित शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या समविचारी पॅनलने 13 जागा जिंकून बहुमत मिळवले होते, तर महायुतीच्या पॅनलला 12 जागांवर समाधान मानावे लागले होते. मात्र निवडणुकीनंतर सरकारने अचानक 5 शासकीय संचालक नेमण्याचा अध्यादेश काढला. त्यानंतर आता अध्यक्ष निवडीसाठी अतिरिक्त 4 शासन नियुक्त संचालकाच्या वाढीचा अध्यादेश काढण्यात आल्याने हा वाद आणखी चिघळला आहे.

सुट्टीची सूचना

मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ व
बुधवार, दि. ११ नोव्हेंबर २०२६

दिपावली निमित्त

दै. संध्या कार्यालयाला सुट्टी असल्याने ११ नोव्हेंबर व १२ नोव्हेंबर रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. १३ नोव्हेंबरपासून अंक नियमितपणे सुरू राहिल. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.


- संपादिका

नऊ एसटीपी केंद्रे डिसेंबरअखेर कार्यान्वित

■ पुणे : (दै. संध्या)

मुळा-मुठा नदी प्रदूषण नियंत्रण प्रकल्पांतर्गत (परम प्रकल्प) सुरू असलेल्या ११ पैकी नऊ सांडपाणी शुद्धीकरण केंद्रांची (एसटीपी) कामे डिसेंबरअखेर पूर्ण होऊन ती कार्यान्वित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मुळा-मुठा नदीच्या प्रदूषणाला काही प्रमाणात अटकाव करण्यास महापालिकेला मदत होणार आहे. उर्वरित दोन केंद्रांची कामे पूर्ण होण्यास आणखी काही महिने विलंब होणार असल्याची चिन्हे आहेत. मुळा-मुठा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी जपान इंटरनॅशनल को-ऑपरेशन एजन्सीच्या (जायका) सहकार्याने महापालिकेकडून सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प राबविला जात आहे. त्याअंतर्गत शहरात ११ ठिकाणी एसटीपी उभारण्याचे काम महापालिकेने हाती घेतले होते. मागील तीन ते चार वर्षांपासून सुरू असलेल्या संबंधित प्रकल्पाला अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले, त्यानंतरही २०२६ पर्यंत संबंधित प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट महापालिकेने ठेवले होते. त्यापैकी नऊ केंद्रांची कामे पूर्णत्वास गेली आहेत. वारजे (२६ एमएलडी), वडगाव (२८ एमएलडी), मुंढवा (२० एमएलडी), मत्स्यबीज केंद्र, हडपसर (सात एमएलडी) आणि खराडी (३० एमएलडी) अशी एकूण १११ एमएलडी क्षमतेची पाच केंद्रे सध्या कार्यान्वित करण्यात आली आहेत. त्यामुळे शहरातील सांडपाणी प्रक्रियेच्या क्षमतेत वाढ होण्यास मदत होणारआहे.







संपादकीय

आंदोलन करायचे की नाही ?

लोकशाही व्यवस्थेत आंदोलन करण्याचा अधिकार हा केवळ घटनात्मक अधिकार नाही, तर तो जनतेच्या असंतोषाला वाट करून देणारा प्रभावी मार्ग आहे. सरकारच्या धोरणा विरोधात आवाज उठवणे, आपल्या मागण्यांसाठी संघर्ष करणे, आणि अन्यायाविरुद्ध संघटित होणे, हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे.मात्र सार्वजनिक जागांवर अमर्याद काळ आंदोलन करता येणार नाही. असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविलेले आहे.कोणत्याही व्यक्तीला, गटाला, किंवा संघटनेला, आंदोलनाच्या निश्चित जागेवर अनिश्चित काळासाठी ठिय्या आंदोलन करता येणार नाही. त्याच सार्वजनिक जागेवर इतर नागरिकांनाही निदर्शने करण्याचा समान घटनात्मक अधिकार आहे. असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाचे हे निरीक्षण विचार करण्यासारखे असले तरी आंदोलनाच्या काल मर्यादेची प्रश्न केवळ सार्वजनिक गैरसोयीच्या निकषावर सोडवता येणार नाही. कॉकरोच जनता पार्टी च्या (सीजेपी) नेतृत्वाखाली जुलैमध्ये झालेल्या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या कारवाई विरोधातील याचिकेवर सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरु होती. या वेळी न्यायालयाने ही भूमिका मांडली. दुसरीकडे किराणा कमिटी दिल्ली,आणि अन्य व्यापारी संघटनेच्या वतीने ज्येष्ठ वकील रोहतगी यांनी आंदोलनामुळे सणासुदीच्या काळात दिल्लीतील व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. रामलीला मैदान आणि कॅनॉट प्लेस परिसरातील रहीवासी, दुकानदार,व व्यावसायिकांना आंदोलनाचा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. पुढील दोन महिने दिल्लीत सर्व प्रकारच्या आंदोलनावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली. चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीजने दिल्लीच्या पोलीस आयुक्तांना पत्र लिहून कॅनॉट प्लेस,जंतर मंतर,रामलीला मैदान, इंडिया गेट, आणि राजघाट, यासारख्या गजबजलेल्या ठिकाणी रॅली, धरणे, व मोर्चाला परवानगी देऊ नये अशी मागणी केली आहे. गेल्या एक नोव्हेंबरच्या इंडिया आघाडीच्या रॅलीमुळे व्यापाऱ्यांचे ११हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा ही दावा संघटनेने केला आहे. आंदोलनामुळे नागरिकांची गैरसोय होते,वाहतुकीचा खोळंबा होतो.आणि व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर परिणाम होतो. हे नाकारता येणार नाही. उपजीविकेचा अधिकार केवळ व्यापाऱ्यांच्या नफ्यापुरता मर्यादित नाही, छोटे दुकानदार, फेरीवाले,आणि रोजंदारीवरील कामगार करणाऱ्या कामगारांचे साठीही तितकेच महत्त्वाचे आहे.मात्र या प्रश्नाचे दुसरे एक महत्त्वाचे अंग आहे.आंदोलनासाठी विशिष्ट जागा निश्चित करून दिल्यावर तेथे आंदोलन करण्यावर काल मर्यादा घातली तर सरकारला आंदोलकांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करण्याची आयती संधी मिळू शकते. आंदोलनाची मुदत संपेपर्यंत मागण्याची दखल न घेता सरकारने वेळ काढूपणा केला तर आंदोलकांनी आपला लढा पुढे कसा न्यायचा?मागण्या मान्य झालेल्या नसताना आंदोलन संपवण्याची घोषणा त्यांनी का? आणि कशासाठी करायची?दिल्लीतील शेतकरी आंदोलनाचा अनुभव या संदर्भात महत्त्वाचा आहे.केंद्र सरकारने आणलेल्या तीन कृषी कायद्याविरोधात शेतकऱ्यांनी दीर्घकाळ आंदोलन केले. सरकारने सुरुवातीला त्यांच्या मागण्याकडे गांभीर्याने पाहिले नाही. उलट आंदोलन दडपण्याचाच प्रयत्न झाले, दिल्लीच्या सीमेवर युद्ध सदृश परिस्थिती निर्माण झाली, अखेर शेतकऱ्यांच्या तीव्र संघर्षानंतर, आणि राजकीय दबाव वाढल्यानंतर,सरकारला कायदे मागे घ्यावे लागले. त्यानंतर सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन असो, किंवा नीट पेपर फुटी विरुद्ध उभारलेल्या संघर्ष असो, सरकारने आंदोलकाशी वेळेवर संवाद साधण्याऐवजी अनेकदा दीर्घकाळ मौन बाळगण्याचे दिसून आले. जेन. झी च्या आक्रमक भूमीकेनंतर, आणि सोशल मीडियावर सरकारवर, टीकेची झोड उठवल्यानंतर काही प्रश्नांची दखल घेतली गेली, हेही विसरता कामा नये. बहुमताचे सरकार सत्तेत आले म्हणजे जनतेच्या प्रत्येक प्रश्नाकडे दुर्लक्ष करण्याचा परवाना मिळाला, असा त्याचा अर्थ होत नाही. उलट बहुमताच्या सरकारने आंदोलनाकाप्रती अधिक संवेदनशील असायला हवे. आंदोलन करणाऱ्यांना आंदोलनजीवी म्हणून हिणवणे, त्यांच्या मागण्यांची टिंगल करणे,पोलिसी बळाचा अनावश्यक वापर करणे, किंवा कोठडीत थर्ड डिग्रीचा अवलंब करणे,हे लोकशाहीला शोभणारे नाही. शैक्षणिक, सामाजिक, आरक्षण विषय,आणि आर्थिक मागण्यासाठी, विविध समाज घटक आंदोलन करतात. या मागण्याची तड लागणे जितके आवश्यक आहे,तितकेच सार्वजनिक जीवन सुरळीत राहणेही महत्त्वाचे आहे, त्यामुळे आंदोलनाचे नियमन, आणि आंदोलकांच्या अधिकाराचे संरक्षण, याचा समतोल साधने ही सरकारची जबाबदारी आहे.न्यायालयाकडून सामान्य जनतेच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत न्यायालयात सरकारचे कान उपटू शकतात यावर अजून सर्वसामान्य जनतेचा विश्वास आहे.

भाऊबीज : ओवाळणीच्या ताटापलीकडचे बहिणीच्या प्रेमाचे ऋण!

(दै. संध्या)

कपाळावरचा टिळा हा केवळ औक्षणाचा संस्कार नाही, तो बहिणीच्या सन्मानाचे, सुरक्षिततेचे आणि आयुष्यभर साथ देण्याच्या वचनाचे प्रतीक असावा!



भारतीय संस्कृतीत काही नाती रक्ताच्या नात्यापलीकडे जाऊन मनाच्या गाभाऱ्यात घर करतात. भाऊ आणि बहिणीचे नाते त्यापैकीच एक! कधी बालपणीच्या भांडणांतून उमललेले, कधी एकाच ताटात जेवताना घट्ट झालेले, तर कधी संकटाच्या काळात एकमेकांच्या पाठीशी उभे राहत अधिक समृद्ध झालेले हे नाते आयुष्यभर माणसाला भावनिक आधार देत असते. दिवाळीच्या उत्सवात भाऊबीज हा दिवस या नात्याच्या प्रेमाला, विश्वासाला आणि आपुलकीला उजाळा देतो. बहिण भावाला ओवाळते, कपाळावर टिळा लावते, औक्षण करते आणि त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊही बहिणीला भेटवस्तू देतो, तिच्या सुखाची काळजी घेण्याचे आश्वासन देतो पण या सगळ्या विधींच्या पलीकडे एक प्रश्न महत्त्वाचा आहे, भाऊबीजेला दिलेले प्रेम आणि संरक्षणाचे वचन आपण वर्षभर पाळतो का?

भाऊबीजेच्या सणामागे यम आणि यमुनेची कथा सांगितली जाते. यम आपल्या बहिणी यमुनेच्या घरी गेला, तिने त्याचे प्रेमाने स्वागत केले, औक्षण केले आणि त्याच्या दीर्घायुष्याची कामना केली, अशी पौराणिक परंपरा प्रचलित आहे. काही कथांमध्ये भगवान श्रीकृष्ण आणि सुभद्रा यांच्या भेटीचाही उल्लेख आढळतो. या कथांमधून बहिणीचे प्रेम, भावाविषयीची आत्मीयता आणि कौटुंबिक नात्यांचे महत्त्व अधोरेखित होते. मात्र, या सणाचा खरा अर्थ केवळ कथांमध्ये किंवा धार्मिक विधींमध्ये शोधण्यापेक्षा तो आपल्या जगण्यात उतरवणे अधिक महत्त्वाचे आहे. लहानपणी भाऊ-बहिणीचे जग किती निरागस असते! खेळण्यावरून भांडण, आईकडे केलेल्या तक्रारी, एकमेकांचे खोडकरपणे घेतलेले उणेदुणे, शाळेतून परतल्यावर वाटून खाल्लेला खाऊ, सणासुदीला नवे कपडे आणि अडचणीच्या वेळी नकळत पुढे केलेला हात. या छोट्या आठवणीच पुढे आयुष्याची मोठी शिदोरी बनतात. काळ बदलतो, घर बदलते, बहिण लग्नानंतर दुसऱ्या घरी जाते, भाऊ आपल्या संसारात रमतो, पण मनाच्या एका कोपऱ्यात बालपणीचे ते नाते कायम जिवंत राहते. बहिण माहेरी आली की घराला पुन्हा एकदा बालपणाचा सुगंध येतो. भावाच्या चेहऱ्यावरही जुन्या आठवणींचे हसू उमटते. पण या सुंदर नात्याचा एक सामाजिक पैलूही आहे.

आपल्या समाजात बहिणीला अनेकदा त्याग, सहनशीलता आणि समर्पण यांचे प्रतीक मानले जाते. ती माहेर सोडते, नवीन घर स्वीकारते, नाती जपते पण तिच्या स्वतःच्या इच्छा, स्वप्ने आणि अधिकार यांना किती महत्त्व दिले जाते? भाऊबीजेच्या दिवशी बहिणीच्या हातून ओवाळणी करून घेणारा भाऊ तिच्या शिक्षणासाठी, स्वावलंबनासाठी आणि निर्णयस्वातंत्र्यासाठी किती ठामपणे उभा राहतो? तिच्या आयुष्यातील अडचणी समजून घेतो का? तिच्या सन्मानावर कुणी आघात केला तर तिच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो का? हे प्रश्न प्रत्येक भावाने स्वतःला विचारले पाहिजेत.

बहिणीचे रक्षण करणे म्हणजे तिला चार भिंतींत सुरक्षित ठेवणे नव्हे, तर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बळ देणे होय. तिच्या कपड्यांवर, मैत्रीवर, शिक्षणावर, नोकरीवर किंवा जीवनसाथी निवडण्याच्या निर्णयावर नियंत्रण ठेवणे म्हणजे प्रेम नव्हे. खरे प्रेम तिच्या स्वातंत्र्याचा आदर करते. बहिणीला मदतीची गरज असेल तेव्हा तिच्या पाठीशी उभे राहणे महत्त्वाचे; पण ती सक्षम असेल तेव्हा तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. संरक्षणाच्या नावाखाली तिचे स्वातंत्र्य हिरावून घेणे ही नात्याची नव्हे, तर पुरुषप्रधान मानसिकतेची खूण आहे.

आजही अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जाते, त्यांच्या स्वप्नांना आर्थिक परिस्थितीचे कारण देऊन रोखले जाते, हुंडा, कौटुंबिक हिंसा, छळ आणि असमानतेला सामोरे जावे लागते. काही ठिकाणी भावाला कुटुंबाच्या मालमत्तेवर अधिकार मिळतो पण बहिणीच्या कायदेशीर हक्कांकडे दुर्लक्ष केले जाते. अशा परिस्थितीत भाऊबीजेच्या दिवशी दिलेली भेटवस्तू कितीही महागडी असली, तरी बहिणीच्या हक्काचा सन्मान नसेल तर त्या भेटीचे मूल्य अपुरेच राहते. बहिणीला मालमत्तेत समान हक्क देणे, तिच्या मताचा आदर करणे, तिच्या संकटात आर्थिक आणि मानसिक आधार देणे, हीच खरी भाऊबीज ठरली पाहिजे. बहिणही भावाच्या आयुष्यात केवळ औक्षण करणारी व्यक्ती नसते. ती त्याची पहिली मैत्रीण, विश्वासू सल्लागार, भावनिक आधार आणि अनेकदा कठीण काळातील निःशब्द शक्ती असते. भावाच्या अपयशात त्याला धीर देणारी, यशात मनापासून आनंद मानणारी आणि त्याच्या चुका स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य ठेवणारी व्यक्ती म्हणजे बहीण. तिचे प्रेम आंधळे नसते, ते समजूतदार असते. भावाच्या प्रत्येक चुकीला पाठिंबा देणे ही मैत्री नाही, तर योग्य वेळी त्याला योग्य मार्ग दाखवणे हीच खरी आपुलकी आहे.

भाऊबीज साजरी करताना समाजातील निराधार मुली, एकट्या राहणाऱ्या महिला, वृद्ध बहिणी, विधवा आणि संकटात असलेल्या स्त्रियांचीही आठवण ठेवली पाहिजे. प्रत्येक स्त्रीला भाऊ असेलच असे नाही, प्रत्येक बहिणीला तिच्या संकटात धावून येणारा आधार मिळेलच असेही नाही. म्हणून नात्यांची व्याप्ती रक्ताच्या नात्यांपुरती मर्यादित न ठेवता माणुसकीपर्यंत वाढवली पाहिजे. एखाद्या गरजू मुलीच्या शिक्षणाला मदत करणे, बहिणीच्या नावाने वृक्षारोपण करणे, तिच्या आरोग्याची काळजी घेणे किंवा तिच्या स्वप्नांना पंख देणे. या कृती भाऊबीजेच्या आनंदाला अधिक अर्थपूर्ण बनवू शकतात. आज सोशल मीडियावर भाऊबीजेच्या शुभेच्छांचा वर्षाव होतो. सुंदर छायाचित्रे, आकर्षक संदेश आणि महागड्या भेटवस्तूंची देवाणघेवाण होते. पण डिजिटल शुभेच्छांपेक्षा प्रत्यक्ष आयुष्यातील संवेदनशीलता महत्त्वाची आहे. वर्षातून एक दिवस बहिणीला ओवाळणे सोपे आहे, पण वर्षातील प्रत्येक दिवशी तिच्या सन्मानासाठी उभे राहणे ही खरी कसोटी आहे. तिच्या डोळ्यांत आनंदाचे अश्रू आणणारी भेट म्हणजे केवळ दागिना किंवा साडी नाही, तर तिच्या स्वप्नांना दिलेली साथ, तिच्या अस्तित्वाचा केलेला सन्मान आणि तिच्या अधिकारांची केलेली जपणूक आहे.

भाऊबीज हा भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा उत्सव आहे, पण त्या प्रेमाला समतेची जोड मिळाली तरच तो अधिक सुंदर बनेल. बहिणीने भावाला ओवाळताना त्याच्या दीर्घायुष्याची कामना करावी आणि भावाने बहिणीला तिच्या स्वातंत्र्याने, स्वाभिमानाने आणि सुरक्षिततेने जगण्याचा विश्वास द्यावा. नात्यात अधिकारापेक्षा आदर, बंधनांपेक्षा विश्वास आणि दिखाव्यापेक्षा संवेदनशीलता महत्त्वाची असावी. कपाळावरचा टिळा काही क्षणांत पुसला जाईल, ओवाळणीचे ताट बाजूला ठेवले जाईल आणि भेटवस्तूंचा आनंदही काळाबरोबर कमी होईल, पण बहिणीच्या सन्मानासाठी आयुष्यभर उभे राहण्याचे वचन कधीही पुसले जाऊ नये. कारण खरी भाऊबीज एका दिवसाची परंपरा नाही, ती आयुष्यभर निभावायची जबाबदारी आहे!



येरवडा खुले कारागृहात बंद्यांसाठी "दिवाळी पहाट" कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ पुणे (दै. संध्या)

■ रोटरी क्लब ऑफ पिंपरी एलीटच्या वतीने मराठी व हिंदी सुमधुर गीतांची सुरेल मैफल

दिवाळी सणाचे औचित्य साधून येरवडा खुले कारागृह, पुणे येथे बंद्यांना दिवाळीचा आनंद, उत्साह आणि सांस्कृतिक वातावरणाचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने सोमवार, दिनांक ९ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ७.०० ते ९.३० या वेळेत 'दिवाळी पहाट' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब ऑफ पिंपरी एलीट, डिस्ट्रिक्ट ३१३१ यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि सुमधुर गीतांची सुरेल मैफल रंगली. या कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ पिंपरी एलीटचे अध्यक्ष रोटेरियन सचिन मोरे, सेक्रेटरी रोटेरियन गिरीश कुलकर्णी तसेच डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन नितीन ढमाले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. सदर कार्यक्रमाचे आयोजन डॉ. श्री. सुहास वारके, पोलीस महासंचालक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, श्री. योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य आणि श्री. सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सांगीतिक मैफलीमध्ये 'प्रभाती सूर नभि रंगली', 'मोगरा फुलला', 'बहरला मधुमास नवा', 'धुंदी कळ्यांना', 'डौल मोराच्या मानाचा', 'ज्योत से ज्योत जगाते चलो', 'श्याम तेरी बंसी' आणि 'अश्विनी ये ना' यांसारख्या लोकप्रिय गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मराठी व हिंदी गीतांच्या सुरेल संगमामुळे संपूर्ण वातावरण प्रसन्न आणि आनंदमय झाले. बंद्यांनीही या कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला. या कार्यक्रमास रोटेरियन सचिन मोरे, रोटेरियन सिद्धी मोरे, रोटेरियन महादेव शेंडकर, रोटेरियन रंजना शेंडकर, रोटेरियन सुनील होळ, रोटेरियन स्मिता होळ, रोटेरियन रवींद्र भावे, रोटेरियन रुबी चटवाल, रोटेरियन विनायक जोग, रोटेरियन विष्णू नांदेडकर, शीतल नांदेडकर, रोटेरियन नितीन ढमाले, सुमंत मोरे, नैतिक मोरे आणि सौ. अर्चना सुतार उपस्थित होते.

दिव्यांचा सण 'दिवाळी'



आश्विन वद्य द्वादशीपासून कार्तिक शुद्ध द्वितीयेपर्यंत जो महोत्सव असतो तो दिवाळी किवा दीपावली या नावाने साजरा करतात. दीपावली हा दिव्यांचा सण आहे. मातीच्या पणत्यां मध्ये तेल-वात घालून जागोजागी ते लावून दिवाळी साजरी केली जाते. साधारणतः चार दिवस हा सण साजरा केला जातो.

वसुबारस :

वसुबारस ह्याचा अर्थ-वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली बारस म्हणजे द्वादशी. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात.या दिवशी गाईची पाडसासह संध्याकाळी पूजा करतात. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे.ज्यांच्याकडे घरी गुरे, वासरे आहेत त्यांच्याकडे ह्यादिवशी पुरणावरणाचा स्वयंपाक करतात. घरातील सवाष्ण बायका गाईच्या पायावर पाणी घालतात. नंतर हळद-कुंकू, फुले, अक्षता वाहून चाफ्याच्या फुलांची माळ त्यांच्या गळ्यात घालतात.निरांजनाने ओवाळून केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गाईला खाऊ घालतात. ह्या दिवसापासून अंगणात रांगोळी काढण्यास सुरूवात करतात. पुष्कळ स्त्रियांचा ह्या दिवशी उपवास असतो. ह्या दिवशी गहू, मूग खात नाहीत.स्त्रिया बाजरीची भाकरी व गवारीच्या शेंगाची भाजी खाऊन उपवास सोडतात. आपल्या मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावे व सुख लाभावे म्हणून ही पूजा करतात.

धनत्रयोदशी (आश्विन वद्य त्रयोदशी) - धनाची पूजा करणे हा या सणामागील हेतू आहे. व्यापारी, दुकानदार लोक ह्या दिवशी या दिवशी पाटावर लक्ष्मीची मूर्ती, वह्या, धंद्याची हत्यारे, सोने, नाणे ह्यांची पूजा करतात. शेतकऱ्यांच्या दृष्टीने नवीन आलेले धान्य हेच त्यांचे धन असते. त्यामुळे ते नवीन धान्याची पूजा करतात. त्यावेळी धने व गूळ ह्यांचा नैवेद्य दाखवतात.ह्या सुमारास झेंडू व शेवंतीची फुले मुबलक प्रमाणावर उपलब्ध असल्यामुळे पूजेला झेंडूची व शेवंतीची फुले वापरतात. या दिवसापासून दारांत आकाशकंदील व पणत्या लावण्यास सुरूवात करतात. ह्या दिवशी संध्याकाळी थोडी कणीक घेऊन त्यांत थोडे तेल व हळद घालून एक दिवा करतात.तो दिवा अंगणात मुद्दाम दक्षिणेकडे तोंड करून ठेवतात.ह्याला 'यमदीपदान'असे म्हणतात. मृत्यूची देवता यमराज - याची अवकृपा होऊ नये म्हणून त्याच्या नावाने दीप ठेवून त्याला हळद-कुंकू वाहून त्याची पूजा करतात.व्यापारी वर्गात हा दिवस फार मोठ्या उत्साहाने साजरा करतात.वैद्य लोक ह्या दिवशी धन्वंतरीची पूजा करतात.

नरक चतुर्दशी :

आश्विन वद्य चतुर्दशी या दिवशी नरकासूर नावाच्या राक्षसाचा श्रीकृष्णाने संहार केला म्हणून या दिवसाला नरक चतुर्दशी असे नाव पडले. ह्या दिवशी सूर्योदयापूर्वी सर्वजण स्नान करतात. स्नानाच्या वेळी उटणे, सुवासिक तेल, सुगंधी साबण वापरतात. सूर्योदयापूर्वीच्या ह्या स्नानाला अभ्यंगस्नान असे म्हणतात. ह्या दिवशी जो कोणी अभ्यंगस्नान करणार नाही तो नरकात जातो अशी समजूत आहे. स्नानानंतर मुले फटाके उडवतात.या दिवशी देवाची पूजा देखील सूर्योदयोपूर्वी करतात. स्नानानंतर घरातील सर्व मंडळी फराळ करतात.फराळाच्या पदार्थांमध्ये चकली, चिवडा, लाडू, शंकरपाळे, अनरसे, चिरोटे इ. पदार्थ प्रामुख्याने असतात.या दिवशी पहाटेच पणत्या लावतात.सर्वत्र समृद्धी व्हावी याकरितां अशा पणत्या लावण्याची प्रथा आहे.या दिवशी सणाच्या दिवशी करतात तसा स्वयंपाक करून देवाला नैवेद्य दाखवतात.

लक्ष्मीपूजन :

या सणामागची पौराणिक कथा अशी आहे की फार पूर्वी बळी नावाचा राजा होऊन गेला.तो खूप श्रीमंत व पराक्रमी होता.त्याने पराक्रमाच्या जोरावर सर्व पृथ्वीची भूमी जिंकून घेतली होती.त्याच्या वाढत्या समृद्धीने देवांना व प्रत्यक्ष लक्ष्मीला सुद्धा अस्वस्थता निर्माण झाली. बळी राजा अत्यंत दानशूर होता. ही गोष्ट जाणून श्री विष्णूने वामनाचे (अत्यंत बुटक्या ब्राह्मणाचे) रूप धारण करून बळीराजाकडे तीन पावले टाकण्यापुरत्या भूमीचे दान मागितले. प्रत्यक्षात मात्र जेव्हा वामनाने एक पाऊल टाकले तेव्हां तो मोठा मोठा होत गेला व एका पावलात त्याने पृथ्वी व आकाश व्याप्त केले, दुसऱ्या पावलात पाताळ व्याप्त केले व तिसरे पाऊल टाकण्यासाठी जागाच उरली नाही म्हणून बळीचे त्याचा माथाच पाऊल ठेवण्यासाठी पुढे केला. विष्णूने त्याच्या माथ्यावर पाय ठेवल्यावर बळी पाताळात गाडला गेला व सर्व देवतांची सुटका झाली. लक्ष्मीचे वर्चस्व अबाधित झाले. याची आठवण म्हणून यादिवशी लक्ष्मीपूजन करतात. व्यापारी लोकांचे हिशोबाचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरू होते.या दिवशी सर्व अभ्यंग स्नान करतात. पाटावर रांगोळी काढून तांदूळ ठेवतात.त्यावर वाटी किवा तबक ठेवतात.त्यात सोन्याचे दागिने, चांदीचा रूपया, मोत्यांचे दागिने ठेवून त्यांची पूजा करतात. ह्या पूजेकरिता झेंडूची फुले, बत्तासे, लाह्या, धणे, गूळ, हळद-कुंकू, अगरबत्ती इ.साहित्याची गरज असते. ह्या दिवशी झेंडूच्या फुलांचे तोरण करून दरवाज्याला लावतात. हा दिवस व्यापारी लोक फार उत्साहात साजरा करतात. जिथे स्वच्छता असते त्या ठिकाणीच लक्ष्मी वास करते अशी धारणा असल्याने पुष्कळ ठिकाणी लोक या दिवशी स्वच्छता करण्यासाठी लागणारी नवी केरसुणी विकत घेतात. तिलाच लक्ष्मी मानून तिच्यावर पाणी घालून हळद-कुंकू वाहून घरात वापरण्यास सुरूवात करतात.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

आचार्य अत्रे भवनात 'स्वर दीपावली'चा सूरमयी जलसा

सासवडकरांची पहाट संगीताच्या सुरांनी उजळली

पत्रकार संघ आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने सलग २१ व्या वर्षी 'दिवाळी पहाट' सोहळा उत्साहात संपन्न



■ सासवड (दै. संध्या)

सासवड शहर पत्रकार संघ आणि महाराष्ट्र शासनाचा सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वर दीपावली' या संगीतमय दिवाळी पहाट सोहळ्याने सासवडकरांची पाडव्याची पहाट अत्यंत आनंदमयी आणि सुरांच्या वर्षावात उजळून निघाली. आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात सोमवारी (ता.९) भल्या पहाटे ५.३० वाजता हा भरगच्च कार्यक्रम रंगला. सासवड शहर पत्रकार संघाच्या वतीने सलग २१ वर्षे ही परंपरा यशस्वीपणे चालवली जात असून, यंदा महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाने या उपक्रमाचे प्रायोजकत्व स्वीकारल्याने सोहळ्याची रंगत अधिकच वाढली. कार्यक्रमाची सुरुवात ऐन दिवाळी प्रसन्न वातावरणात आचार्य अत्रेंच्या अर्धपुतळ्याला आणि कलाव्यासपिठाला पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर महाराष्ट्रातील दिग्गज आणि नामांकित गायकांनी एकापेक्षा एक सरस गाणी, भक्तीगीते आणि भावगीते सादर करून उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. 'झी सारेगमप'चा महाविजेता डॉ. अभिजित कोसंबी, 'संगीत सम्राट महासंग्राम' व 'सूर नवा ध्यास नवा' फेम रवींद्र खोमणे आणि 'सूर नवा ध्यास नवा' सीझन तीन ची विजेती राधा खुडे यांच्या बहारदार गायकीने संपूर्ण अत्रे भवन संगीतमय झाले. त्यांच्या सोबतीला... यांच्या सुरेल साथीने उपस्थितांची दाद मिळवली. 'शब्द संवाद वाढवा' या संदेशासह सर्व रसिकप्रेक्षकांनी या स्वरोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. महाराष्ट्राच्या दैदिप्यमान लोकसंस्कृतीचे दर्शन घडवत 'महाराष्ट्र गीता'ने आणि मंगलमय गणेश वंदनेने या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमात 'माय भवानी तुझे लेकरू', 'गौळण.. मुळीच नव्हतं रे कृष्णा', 'वासुदेव गीत', 'आली माझ्या घरी ही दिवाळी', 'विठू माऊली तू, माऊली... माऊली...', 'बुगडी माझी सांडली ग...', 'सुरू झालीया पेरण' यांसारखी एकापेक्षा एक बहारदार पारंपरिक गीते, लावणी आणि मराठमोळी लोकगीते सादर करण्यात आली. यासोबतच 'कारभारी दमानं' आणि 'साईबाबा आला' या लोकप्रिय गीतांनी सभागृहात वेगळाच उत्साह भरला.

प्रसिद्ध गायक रविंद्र खोमणे यांनी आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या आवाजात 'या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे','दत्त दर्शना जायच..','आनंद पोटात माझ्या मायेना', 'निघालो घेऊन दत्ताची पालखी', 'राज आलं राज आलं...' आणि 'रामजी की निकली सवारी...' ही गीते सादर करून रसिकांची मने जिंकली. तर लोकप्रिय गायक डॉ. अभिजीत कोसंबी यांनी 'भेटला विठ्ठल..', 'गालावर खळी डोळ्यात धुंदी...', 'माझा रंग तू घे', 'माझी मैना गावावर राहिली' आणि 'लख्ख पडला प्रकाश' यांसारख्या प्रसिद्ध गाण्यांनी कार्यक्रमात सुरांची उधळण केली. गायिका राधा खुडे यांच्या बहारदार गायकीनेही प्रेक्षकांना डोलायला लावले. प्रत्येक गीताला मिळालेली दर्जेदार नृत्याची जोड आणि पात्रांची हुबेहूब वेशभूषा यामुळे या कार्यक्रमाने एक वेगळीच उंची गाठली. सासवडकर रसिकांनी या सोहळ्याला उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद दिला.

श्री साईकृपा एंटरप्रायझेस मुंबई व अमित घरत यांची निर्मिती व दिग्दर्शन असणारा आणि धीरज पारकर, अभिषेक गाडेकर, पुजा सावंत, संगीता पांचाळ या गायक मंडळीबरोबरच आकांक्षा कदम व स्वरा रेवंडकर या लावणी नृत्यांगनांच्या दमदार सादरीकरणास चंद्रकांत पांचाळ, परेश धामणकर, प्रकाश सानप, कुणाल सातपुते, यज्ञेश अडवलंकर, अवधूत गायकवाड यांची सुरेल संगीत साथ व आकाश भागवत यांचे समयोचित सूत्रसंचालन कार्यक्रमाच्या जमेच्या बाजू ठरल्या. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर, पुणे पदवीधरच्या आमदार हर्षदा जाधव, माजी आमदार अशोक टेकवडे आणि नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांनी मनोगतातून शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांच्या विशेष सहकार्याने हा शासकीय पातळीवरील दिवाळी पहाट सोहळा सासवडमध्ये दिमाखात पार पडला. पत्रकार संघाच्या या सलग चालणाऱ्या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

जिल्हा बँकेचे डॉ. दिगंबर दुर्गाडे, नगरपरिषदेचे गटनेते अजित जगताप, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संभाजी जगताप, माजी उपनगराध्यक्ष संजय ग. जगताप, माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, प्रदीप पोमण, अनिल उरवणे, मार्केट कमिटीचे सभापती संदीप फडतरे, पंचायत समितीचे सदस्य माणिक निंबाळकर, नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत, तसेच गणेश जगताप, नंदकुमार सागर, रविंद्रनाथ ताकवले, यांसह तालुक्यातील विविध गावांमधील कलारसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


पत्रकार संघाचे हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन, सुधीर गुरव यांनी प्रास्ताविक तर विजय कोलते यांनी आभार मानले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी पत्रकार संघाचे जीवन कड, गणेश मुळीक, संभाजी महामुनी, बाळासाहेब कुलकर्णी, संदीप जगताप, जगदीश शिंदे, गौरव कोलते, सुनील वढणे, नितीन यादव, तानाजी सातव, मनोज मांढरे यांनी परिश्रम घेतले.



पीसीसीओई मध्ये 'पालक व विद्यार्थी संबंध दृढता सभा' संपन्न

■ पिंपरी, पुणे (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीसीओई) येथे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अंतर्गत सार्वत्रिक मानवी मूल्य नोडल केंद्र (यूएचव्ही) सेलच्या सहकार्याने "पालक व विद्यार्थी संबंध दृढता सभा" आयोजित करण्यात आली होती. यावेळी पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उप संचालक डॉ. निळकंठ चोपडे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. राजेश्वरी कन्नन, विज्ञान विभाग प्रमुख डॉ. लीना शर्मा, डॉ. संदीप पाटील, मंजुषा देवकुळे, युएचव्ही सेल मार्गदर्शक डॉ. महेश कोलते आदी उपस्थित होते. या सभेस पुणे, मुंबई, नागपूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, अमरावती, भुसावळ, जळगाव आणि शिर्डी आदी विविध शहरातील ८३ पालकांनी सहभाग घेतला होता. पालक व विद्यार्थी चिंतनशील पत्रलेखन उपक्रमात पालकांच्या मुलांबाबत स्नेह, आशा, अपेक्षा, कौतुक, भावना व्यक्त झाल्या. डॉ. राजेश्वरी कन्नन यांनी सांगितले की, उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पालक आणि विद्यार्थी यांच्या मधील नात्यांमध्ये बदल होतात. मुलांची वाढते वय, त्यांना हवे असलेले स्वातंत्र्य, त्यांचा विकसित होणारा दृष्टिकोन आणि स्वायत्तेची गरज ओळखून पालकांनी मुलांना भावनिक सुरक्षा, विश्वास आणि योग्य मार्गदर्शन करावे. डॉ. लीना शर्मा यांनी सांगितले की, पालकांनी पाल्यांसोबत प्रेमळ संवाद साधावा. परस्पर सामंजस्य आणि सामायिक जबाबदारी यासाठी प्रोत्साहन द्यावे. पालकांनी घरात व नात्यात असे वातावरण निर्माण करावे की मुले चिंता व्यक्त करताना, चुका मान्य करताना, आव्हानात्मक परिस्थितीत निर्णय घेण्यास पालकांशी हितगुज साधायला तयार झाली पाहिजेत. डॉ. संदीप पाटील यांनी शैक्षणिक व वास्तविक काही जीवनातील प्रसंग सांगून विद्यार्थ्यांशी संवादात्मक चर्चा केली. समन्वयक मंजुषा देवकुळे यांनी वैश्विक मानवी मूल्य यांचे महत्त्व सांगितले. नाते संबंधात विश्वास, आदर, स्नेह, काळजी आणि मार्गदर्शन ही मूल्यं आवश्यक आहेत. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या पालक - विद्यार्थी संबंध दृढता सभेचे आयोजन करण्यात आले होते.



दिवाळीचा एक दिवा कुणासाठी

लेखन : B. S. Kendre (विद्यार्थी)
संपर्क : 7218160575 (WhatsApp)

■ (दै. संध्या)

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा, आनंदाचा आणि मांगल्याचा उत्सव! घराघरांत दिव्यांची रोषणाई करताना आपल्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणाऱ्या व्यक्तींचे स्मरण करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. यंदा दिवाळीचा एक दिवा अशा प्रत्येकासाठी लावूया, ज्यांच्या त्यागामुळे, कर्तृत्वामुळे आणि संघर्षामुळे आपले जीवन उजळले आहे...

दिवाळीचा एक दिवा त्या शहीद योद्ध्यांसाठी आणि क्रांतिकारकांसाठी, ज्यांच्या सर्वोच्च बलिदानामुळे आज आपण स्वातंत्र्याचा श्वास घेऊ शकतो आणि सन्मानाने जगू शकतो.
दिवाळीचा एक दिवा त्या सैनिक आणि पोलीस बांधवांसाठी, जे स्वतःच्या कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र डोळ्यांत तेल घालून आपल्या देशाचे आणि समाजाचे रक्षण करतात.
दिवाळीचा एक दिवा छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांसाठी, ज्यांच्या शौर्य, त्याग आणि स्वराज्यनिष्ठेमुळे आपली संस्कृती, श्रद्धास्थाने आणि अस्मिता सुरक्षित राहिली.
दिवाळीचा एक दिवा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि सर्व महापुरुषांसाठी, ज्यांनी आपल्या विचारांच्या आणि ज्ञानाच्या प्रकाशाने समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि विषमतेचा अंधार दूर करण्याचा मार्ग दाखवला.
दिवाळीचा एक दिवा त्या सर्वांसाठी, जे शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने आपले घर, गाव आणि आप्तस्वकीयांपासून दूर परगावी राहून स्वप्नपूर्तीसाठी संघर्ष करतात.
दिवाळीचा एक दिवा त्या विद्यार्थ्यांसाठी, जे आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी कष्ट घेतात, मेसचे बेचव जेवण खातात, अनेक अडचणी सहन करतात; पण ध्येयापासून कधीही दूर जात नाहीत.
दिवाळीचा एक दिवा त्या बळीराजासाठी, जो काळ्या मातीत घाम गाळून हिरवे सोने पिकवतो आणि संपूर्ण जगाचे पोट भरतो; मात्र स्वतःच्या आयुष्यातील अनेक अंधारांशी झुंज देत असतो.
दिवाळीचा एक दिवा त्या मित्रांसाठी आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्यासाठी, जे आपल्या सुख-दुःखात सहभागी होतात आणि संकटाच्या काळात कोणतीही अपेक्षा न ठेवता खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे राहतात.
दिवाळीचा एक दिवा खेळाडू, कलाकार, व्यावसायिक आणि अधिकारी यांच्यासाठी, जे आपल्या मेहनतीने, जिद्दीने आणि कर्तृत्वाने देशाचे व समाजाचे नाव उंचावत असतात.
आणि दिवाळीचा एक दिवा त्या प्रत्येकासाठी, ज्यांच्या आयुष्यात आज दुःख, निराशा, संघर्ष आणि अंधार आहे. त्यांच्या जीवनात आशेची एक नवी ज्योत निर्माण व्हावी, त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आनंद फुलावा आणि त्यांच्या आयुष्यातही सुखाचे दिवस यावेत, हीच मनापासून प्रार्थना!
चला तर मग, यंदाच्या दिवाळीत केवळ आपल्या घरातच नव्हे, तर इतरांच्याही आयुष्यात आनंदाचा आणि माणुसकीचा प्रकाश पसरवूया. कारण खरा दिवा तोच, जो स्वतः जळून दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करतो.
ही दिवाळी आपल्या आणि आपल्या कुटुंबातील सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य, समाधान आणि नवचैतन्याचा प्रकाश घेऊन येवो!
आपणास व आपल्या परिवारास दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

शिरूरच्या श्री शनिमंदिरात उद्योगपती
प्रकाश धारीवाल यांच्या हस्ते चांदीचा मुकुट अर्पण



■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर शहरातील ऐतिहासिक व प्रसिद्ध श्री शनी महाराज मंदिरात दिवाळीच्या शुभमुहूर्तावर प्रसिद्ध उद्योगपती प्रकाशशेठ धारीवाल व आदित्य धारीवाल यांच्या हस्ते शनिमहाराजांच्या चरणी चांदीचा मुकुट भक्तिभावाने अर्पण करण्यात आला. या धार्मिक सोहळ्यामुळे मंदिर परिसरात मंगलमय व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. श्री शनी महाराजांच्या दर्शनाने मनाला शांती व समाधान लाभते. धार्मिक स्थळांचे पावित्र्य जपणे तसेच सामाजिक आणि धार्मिक कार्यात योगदान देणे हे आपले कर्तव्य असल्याची भावना यावेळी प्रकाश धारीवाल यांनी व्यक्त केली. धारीवाल कुटुंबीयांकडून दरवर्षी दिवाळीच्या सणानिमित्त श्री शनिमहाराजांचे दर्शन घेतले जाते. यंदाही त्यांनी मंदिरात उपस्थित राहून दर्शन घेतले व चांदीचा मुकुट अर्पण केला. या धार्मिक सोहळ्याचे औचित्य साधून मंदिराचे व्यवस्थापक रवी गोसावी यांनी मुकुट अर्पणाच्या कार्यक्रमाची व्यवस्था केली. उपस्थित भाविकांनीही शनिमहाराजांचे दर्शन घेतले. यावेळी धारीवाल कुटुंबीयांसह मंदिर व्यवस्थापन व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री शनिमहाराजांच्या आशीर्वादाने हा धार्मिक सोहळा उत्साहात पार पडला. चांदीच्या मुकुट अर्पणामुळे मंदिराच्या धार्मिक परंपरेत आणखी एक मंगलमय अध्याय जोडला गेला.

अश्वमेध कम्युनिकेशन
आयडियांची दौड, संवादाचा अश्वमेध!
दिवाळीचा उत्सव...
प्रकाशाचा, नवसर्जनाचा आणि नात्यांचा!
या प्रकाशमयी पर्वावर आम्ही उजळवतो
ब्रँडचा विश्वास, संवादाची दिशा आणि
नात्यांची जाणीव!
आपली ओळख,
आमचा अभिमान,
आपला संदेश,
आमचा संकल्प!
reative • Strategic • Impactful
अश्वमेध कम्युनिकेशन
जिथे प्रत्येक मोहिम
एक नव्या विजयानं संपते!
ASHWAMEDH
COMMUNICATIONS
संपर्क:- 99214 46690 कैवल्य पेठकर
A Division of Ideas & Influence

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा रिपब्लिकन पक्ष मजबूत करा!

उपमहापौर परशुराम वाडेकर यांचे कार्यकर्त्यांना आवाहन; वडगाव शेरी मतदारसंघात १५ शाखांचे उद्घाटन

कार्यकर्ता मेळावा आणि पदनियुक्ती पत्रांचे वाटप उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)

रिपब्लिकन पक्ष हा खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा पक्ष असून, श्रमिक, कष्टकरी आणि समाजासाठी समर्पित भावनेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा हा पक्ष आहे. बाबासाहेबांचे विचार समाजाच्या तळा गाळापर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून पक्षाशी एकनिष्ठ राहावे आणि रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढवावी, असे आवाहन पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), पुणे शहराच्या वतीने वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात एकाच दिवशी १५ शाखांचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर वडगाव शेरी परिसरातील ब्रह्मा सनसिटी रोडवरील समर्थ बँक्वेट हॉल येथे कार्यकर्ता मेळावा आणि पदनियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना वाडेकर बोलत होते.

यावेळी शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, पुणे शहर सरचिटणीस महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, वडगाव शेरी मतदारसंघ अध्यक्ष विनोद टोपे, खिश्चन आघाडीचे शहराध्यक्ष क्रिस्टोपर राजमनी, नगरसेवक निलेश आल्हाट,नगरसेविका हिमाली कांबळे, बाबुराव घाडगे, शहर उपाध्यक्ष सुनील गवळी, अर्जुन आल्हाट, निलेश रोकडे, फिरोज खान, शमशुद्दीन शेख, चांदणी गायकवाड,मीनाज मेमन,हर्षदा गायकवाड, रेणुका चलवादी, भारत पवार, भीमा राठोड, भीमराव वानखेडे, पोपट कांबळे, संग्राम रोहम, अयुब जहागीरदार, संग्राम साळवे, सुधीर जगताप, रवी अवसरमल, अक्षय अवसरमल, जितेंद्र कांबळे, सुयश वाघमारे,



किरण अवसरमल, चंद्रकांत जगधने, फिरोज शेख, आबा गायकवाड, नवनाथ रिठे, शशिकला थोरात, किरण सूर्यवंशी, स्टेनली नाथन आदि उपस्थित होते.

वाडेकर म्हणाले, मतांची चोरी झाल्याचा आरोप करणाऱ्या राहुल गांधी यांनी काँग्रेसमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा निवडणुकीत पराभव झाला, त्याला काँग्रेस जबाबदार होती, याचे उत्तर आधी द्यावे. दिवसातून तीन पक्ष बदलणाऱ्या नेत्यांच्या मागे कार्यकर्त्यांनी जाऊ नये. आजच्या राजकारणात निष्ठा हीच नेत्यांची खरी ओळख आहे. आगामी काळात सर्वसामान्य नागरिक पक्षनिष्ठेला अधिक महत्त्व देतील.

संजय सोनवणे म्हणाले, शाखा निर्मितीच्या माध्यमातून पक्षाचा विस्तार होणे अत्यंत गरजेचे आहे. पक्षवाढीच्या दिशेने शाखा निर्मिती हे पहिले महत्त्वाचे पाऊल आहे. बाळासाहेब जानराव म्हणाले, पुणे शहरात रिपब्लिकन पक्षाचे गतवैभव पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. मित्रपक्ष सध्या रिपब्लिकन पक्षाला नगरसेवक निवडणुकीत केवळ पाच ते सहा जागा देतात. मात्र, पक्षाची ताकद एवढी वाढवली पाहिजे की मित्रपक्षांनी स्वतःहून किमान ४० जागा रिपब्लिकन पक्षाला द्याव्यात.

धामणीत सोमवतीला सदानंदाचा येळकोट

■ मंचर (दै. संध्या)

पुणे, नगर, नाशिक आणि मुंबई जिल्ह्यांतील हजारो भाविकांचे कुलदैवत असलेल्या धामणी (ता. आंबेगाव) येथील खंडोबा मंदिरात सोमवारी (दि. ९ नोव्हेंबर २०२६) सोमवती अमावस्येनिमित्त शेकडो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. 'सदानंदाचा येळकोट'च्या जयघोषात, भंडारा व खोबऱ्याची उधळण आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात सोमवतीचा धार्मिक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. रविवारी (दि. ८ नोव्हेंबर) दुपारी अमावस्या सुरू होऊन सोमवारी दुपारी एक वाजेपर्यंत सोमवतीचा पर्वकाळ असल्याने पहाटे पाच वाजता शिरूर, आंबेगाव, जुन्नर आणि खेड तालुक्यांतील खंडेरायाच्या सोमवतीचे तसेच मानाच्या काठीचे दहा मानकरी यांच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंगाचा रुद्राभिषेक, दुग्धाभिषेक व आरती करण्यात आली. त्यानंतर सकाळी सात वाजता उगवत्या सूर्याच्या साक्षीने गावातून वाघे व वीर मंडळींनी खंडोबा मंदिरात आणलेल्या पालखीत खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या उत्सवमूर्ती विराजमान करण्यात आल्या. त्यानंतर पालखीने वाजतगाजत देवमळ्यातील विहिरीकडे शाहीस्नानासाठी प्रस्थान केले. यावेळी भंडारा, खोबरे आणि फुलांची उधळण करीत 'सदानंदाचा येळकोट'चा जयघोष करण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत पालखीला सलामी देण्यात आली. सरत्या २०२६ वर्षातील शेवटची व दुसरी सोमवती असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. सोमवारी



दुपारी एक वाजेपर्यंत पर्वकाळ असल्याने उत्सवमूर्तींच्या शाहीस्नानाचा लाभ घेण्यासाठी तसेच पालखीच्या शाही मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पालखीतून देवाचे मुखवटे सोमवती स्नानाच्या ओट्यावर आणण्यात आले. सोमवती पालखीचे व मानाच्या काठीचे मानकरी असलेल्या नरके, राजगुरू, कांदळकर, गावडे, पडवळ, वायकर, पंचरास, घोडे, बोरचाटे, आवटे, कुरकूटे आणि मेंगडे या कुळांतील मंडळींच्या हस्ते देवाच्या मुखवट्यांना सुवासिक दवण्याचे अत्तर व गुलाबपाण्याचे मिश्रण करून चंदनऊटीचा लेप लावण्यात आला.

'स्वर गंधार'च्या सुरांनी आकुर्डीत रंगली दिवाळी पहाट

भक्तिगीते आणि भावगीतांच्या सुरेल सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध

■ आकुर्डी (दै. संध्या)

आकुर्डी येथील ऐश्वर्यम कम्फर्ट गोल्ड सोसायटीमध्ये ६ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेला 'दिवाळी पहाट' हा सांगीतिक कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आकुर्डी येथील 'स्वरगंधार' संगीत समूहाने सादर केलेल्या मराठी व हिंदी भक्तिगीतांनी आणि भावगीतांनी उपस्थित रसिकांची मने जिंकली. अनिता पवार यांनी निवेदन करून कार्यक्रमाची प्रास्तावनेने सुरुवात केली.

या कार्यक्रमात गायिका सौ.मानसी नाटेकर, सिद्धी देव, साक्षी मंगरूळकर तसेच गायक स्वप्नील चिल्हाळ आणि सोहम जोग यांनी विविध गीतांचे सुरेल व भावपूर्ण सादरीकरण केले. त्यांच्या गायनाला उपस्थित रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली. भक्तिगीते आणि भावगीतांच्या सुरेल मेजवानीमुळे संपूर्ण वातावरण संगीतमय झाले होते.



यावेळी विनीत नाटेकर (हार्मोनियम), निषाद नाटेकर (तबला), तर शुभम चिल्हाळ यांनी (ऑक्टोपॅड), नितीन मचुरीकर(बासरी)यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. भालचंद्र नाटेकर यांनी केलेल्या समर्पक निवेदनामुळे कार्यक्रमास एक वेगळी उंची लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सोसायटीचे अध्यक्ष गोरक्षनाथ गोल्हार, खजिनदार राघवेंद्र अटाळकर, सचिव कमलेश छाजेड या व्यवस्थापन समितीसह सागर शेवाळे, शीतल अटाळकर, मानसी कुलकर्णी, प्रशांत नरवडे, पवनकुमार देशपांडे, नामदेव खरपे व इतर सर्व उत्साही सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले आणि आयोजनात मोलाचे योगदान दिले. सामाजिक कार्यकर्ते गणेश लंगोटे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी उपस्थितांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. सुरेल संगीत, कलाकारांचे भावपूर्ण सादरीकरण आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यांमुळे कम्फर्ट गोल्ड सोसायटीतील ही दिवाळी पहाट अविस्मरणीय ठरली. संगीताच्या या सुरेल मैफलीने उपस्थितांच्या मनात आनंदाची आणि समाधानाची भावना निर्माण केली. हा अविस्मरणीय स्वरानुभव दीर्घकाळ स्मरणात राहील, अशा भावना रसिकांनी व्यक्त केल्या.

चारा बियाण्यांचे मोफत वाटप

■ बारामती (दै. संध्या)

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बारामती तालुक्यातील शेतकऱ्यांना चारा टंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी पंचायत समितीच्या वतीने विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. तालुक्यातील शेतकऱ्यांना चारा टंचाई जाणवू दिली जाणार नाही, अशी ग्वाही पंचायत समितीच्या वतीने देण्यात आली आहे. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रयत्नांतून जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा एक भाग म्हणून बारामती तालुक्यातील निंबोडी येथे शेतकऱ्यांना मोफत सुधारित चारा बियाण्यांचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागांतर्गत बारामती तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखाना, निंबोडी यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पंचायत समितीच्या उपसभापती शुभांगी आगवणे, सरपंच संतोष सोनवणे, माजी उपसरपंच भालेराव जाचक यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. पशुधनाला गुणवत्तापूर्ण व पौष्टिक आहार मिळावा, तसेच पशुपालक शेतकऱ्यांना चाऱ्याची उपलब्धता सुलभ व्हावी, या उद्देशाने सुधारित चारा बियाण्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. राम गोटमाळे यांनी चारा बियाण्यांची लागवड, चारा उत्पादनाचे नियोजन आणि मुरघास निर्मिती याबाबत शेतकऱ्यांना सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना चारा उत्पादनासाठी प्रोत्साहन मिळणार असून, पशुधनासाठी वर्षभर पौष्टिक चारा उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. पशुपालक शेतकऱ्यांना दिलासा देणारा उपक्रम ठरत आहे.

Happy Diwali
Festival Of Lights

वसुबारस (गोवत्स द्वादशी)

सडा सारवण अंगणी केले,
दिवे लावूनी स्वागत झाले.
गोमातेचे पूजन वंदन,
वसुबारसला पहिला मान. -- १

सजली गाय अन् सजिले वासरू,
प्रेम तयांचे कसे काय विसरू.
तांब्या-पितळी भरुनी पाणी,
गाऊ माऊलीची गोड गाणी. -- २

गूळ-खोबरे नैवेद्य हा छान,
कृतज्ञतेचा देऊया मान.
कृषीवलाची तूच माऊली,
अखंड राहो तुझी सावली. -- ३

दिवाळीची ही सुंदर सुरुवात,
अंगण उजळे दिव्यांच्या प्रकाशात.
वसुबारसचा सण हा गोड,
भक्तीभावाला नाही तोड. -- ४
रमा एकादशी कार्तिक मासी आली,

रमा एकादशी

रमा एकादशीच्या नावाने सजली।
व्रत-नेमाने पावन व्हावे,
हरी नामाचे भजन गावे। (१)

रमा म्हणजेच लक्ष्मी माता,
विष्णू चरणी जी शीश नमता।
दोघांचेही करुनी ध्यान,
मिळेल सुख-शांती, आत्मज्ञान। (२)

उपवास धरूनी अंतरी साचे,
स्मरण करावे पंढरीनाथाचे।
तुळशी वृंदावन सजले आज,
भक्तीचा चढला सुंदर साज। (३)

पापे जळती या व्रताने,
मन सुखावे हरीच्या नावाने।
रमा एकादशीचा हा दिन थोर,
आनंदाचा वर्षतो आहे पूर। (४)

धनत्रयोदशी

धनत्रयोदशीचा सोहळा आला,
सोन्या-चांदीने बाजार सजला.
धन्वंतरीची पूजा आज,
आरोग्याचा हा सुंदर साज. १

आरोग्य हेच खरे धन जाण,
वैद्यदेवाचे करूया ध्यान.
दीपक लावून यमाला पुजू,
अपमृत्यूचे भय मग त्यजू. २

घरभर उजळल्या समया छान,
लक्ष्मी माता देईल वरदान.
मेहनतीचे जे धन मिळते,
त्यातच खरे तर सुख लाभते. ३

सुख-समृद्धी लाभो घराला,
आरोग्य लाभो या शरीराला.
धनत्रयोदशीचा हा सण पावन,
आनंदी होवो सर्वांचे जीवन. ४

नरक चतुर्दशी

पहाटे पहाटे उषःकाल झाला,
नरक चतुर्दशीचा सण हा आला.
कारीट फोडून नरकासूरला मारू,
मनातला अहंकार दूर सारू. ॥१॥

उटणे लावून सुवासिक छान,
मायेने होईल अभ्यंगस्नान.
आई-बहिणी ओवाळती दारी,
सुख येईल आज घरोघरी. ॥२॥

रंगबेरंगी रांगोळ्या दारात,
फटाक्यांचा आवाज हवेत.
सुगंधी अत्तराचा दरवळ छान,
नव्या कपड्यांचा वेगळाच मान. ॥३॥

दुष्ट प्रवृत्तीचा नाश होत जावो,
सत्याचा जगात विजय होत राहो.
नरक चतुर्दशीची पहाट असते गोड,
आनंदाला या नाही बिलकुल तोड. ॥४॥

लक्ष्मीपूजन

अमावस्येची ही सोनेरी रात्र,
लक्ष्मीपूजनाने पावन हे क्षेत्र.
सोनपावलांनी लक्ष्मी माता,
घरोघरी येई सुख-समृद्धी देता. (१)

केरसुणीला लक्ष्मी मानून,
पूजा करूया मनोभावे जाणून.
तांब्या-नाणी अन् सोन्याचे दागिने,
पुजूया आज आपण सखोल प्रेमाने.(२)

धनाचा तो साठा, धान्याची रास,
घराघरात व्हावा आनंदाचा वास.
लाडू, करंज्यांचा नैवेद्य छान,
मातेला देऊया भक्तीचा मान.(३)

अंधार दूर सारुनी जाई,
प्रकाशाची ही लख्ख नवलाई.
लक्ष्मी माता प्रसन्न हो सदासर्वदा,
दूर होवो आळस अन् आपदा. ॥ ४ ॥

- नरेंद्र ह. राऊत, मधुकर नगर, दहिसर (पश्चिम) मुंबई

बलिप्रतिपदा (पाडवा)

बलिप्रतिपदा म्हणजेच पाडवा,
साडेतीन मुहूर्ताचा हा गोडवा.
विक्रम संवताची सुरुवात होते,
आनंदाची ही नवी पहाट येते. ॥१॥

इडा-पिडा टळो, बळीचे राज्य येवो,
अशीच प्रार्थना मुखात राहो.
पती-पत्नीच्या प्रेमाचा हा सण,
ओवाळणीत गुंतले सुखद मन. ॥२॥

सुवासिनी पतीला ओवाळती दारी,
प्रेम अन् आदराची भावना भारी.
गुढी उभी करून नव वर्षाची,
घरोघरी होते पूजा अर्चा हर्षाची. ॥३॥

नव्या संकल्पांचा हा शुभ दिन,
आनंदाने न्हाले अवघे जन.
दिपावली पाडव्याचा सण हा गोड,
नात्यांना देई प्रेमाची अमूल्य जोड. ॥४॥

भाऊबीज

कार्तिक द्वितीया म्हणजे भाऊबीज,
बहीण-भावाच्या प्रेमाची असते वीज.
यमुना-यमाची ही जुनी कहाणी,
बहिणीच्या डोळ्यात
आनंदाश्रू पाणी.॥१॥

भाऊ येतो लाडका घराला,
बहीण ओवाळी त्याच्या जीवाला.
दीपाच्या ज्योतीने रूप हे उजळे,
भावाचे आयुष्य सुखाने भरले. ॥२॥

लाडू पेढ्याचा भरवून घास,
बहीण मागे एकच आस.
अखंड राहो भावाचे सुख,
कधीही न येवो त्याच्यावर दुःख. ॥३॥

ओवाळणी देई भाऊ तो छान,
राखील बहिणीचा नेमाने मान.
भाऊबीजेचा हा सोहळा अति गोड,
रक्ताच्या या नात्याला प्रेमाची जोड.॥४॥

नरेंद्र ह. राऊत, मधुकर नगर, दहिसर (पश्चिम) मुंबई

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ड क्षेत्रिय कार्यालय (देवगिरी), स्थापत्य विभाग
रहाटणी, पुणे- ४११०१७
निविदा नोटीस क्र.०२/१६/२०२६-२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडुन खालील नमुद केलल्या कामांसाठी ई-टेंडरींग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविणेत येत आहे. १) प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळुन दर द्यावेत.

अ. क्र.	विभाग	कामाचे नाव	निविदा र.रू.	बयाणा रक्कम (१%)	अनामत रक्कम (५%)	कामाची मुदत (महिने)	निविदा फी GST (परत न मिळणारी)
१	स्थापत्य	प्रभाग क्र. २१ अ (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८४२२०	७८४२	३९२११	९	१६६०
२	स्थापत्य	प्रभाग क्र. २१ ब (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८४९१९	७८४९	३९२४६	९	१६६०
३	स्थापत्य	प्रभाग क्र. २१ क (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८४८३३	७८४८	३९२४२	९	१६६०
४	स्थापत्य	प्रभाग क्र. २१ ड (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७५७९	७८७६	३९३७९	९	१६६०
५	स्थापत्य	प्रभाग क्र. २७ अ (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७९८७	७८८०	३९३९९	९	१६६०
६	स्थापत्य	प्रभाग क्र. २७ ब (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७७३१	७८७७	३९३८७	९	१६६०
७	स्थापत्य	प्रभाग क्र. २७ क (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८६६५७	७८६७	३९३३३	९	१६६०
८	स्थापत्य	प्रभाग क्र. २७ ड (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७७७०	७८७८	३९३८९	९	१६६०
९	स्थापत्य	प्रभाग क्र. २८ अ (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७३६५	७८७४	३९३६८	९	१६६०
१०	स्थापत्य	प्रभाग क्र. २८ ब (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७७३३	७८७७	३९३८७	९	१६६०
११	स्थापत्य	प्रभाग क्र. २८ क (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८६५३९	७८६५	३९३२७	९	१६६०
१२	स्थापत्य	प्रभाग क्र. २८ ड (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८६८२५	७८६८	३९३४१	९	१६६०
१३	स्थापत्य	प्रभाग क्र. २९ अ (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७८६२	७८७९	३९३९३	९	१६६०
१४	स्थापत्य	प्रभाग क्र. २९ ब (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७१५४	७८७२	३९३५८	९	१६६०
१५	स्थापत्य	प्रभाग क्र. २९ क (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७२१३	७८७२	३९३६१	९	१६६०
१६	स्थापत्य	प्रभाग क्र. २९ ड (अंतर्गत स्थापत्य विभागाची कामे करणे)	७८७८७५	७८७९	३९३९४	९	१६६०

.	ई निविदा उपलब्ध कालावधी	दिनांक : १२/११/२०२६ ते दिनांक : २६/११/२०२६
.	निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ	दिनांक : २६/११/२०२६, दुपारी ०३:०० पर्यंत
.	निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ	निरंक
.	निविदा उघडणेचा दिनांक	दिनांक : ३०/११/२०२६ दु. ०३:०० वा. (शक्य झालेस)

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णत: किंवा अंशत: मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार मा. आयुक्त / मा. सहा. आयुक्त तथा क्षेत्रिय अधिकारी / मा. कार्यकारी अभियंता यांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरु राहिल. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

https://mahatenders.gov.in सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रीक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

जाहिरात क्रमांक :- 2026-27/177
'ड' क्षेत्रीय कार्यालय, देवगिरी, रहाटणी
क्र.डक्षेका/प्रशा/०३/कावि/१३३/२०२६
दिनांक :- ०५/११/२०२६

सही/-
लेखाधिकारी
ड क्षेत्रिय कार्यालय (देवगिरी)
रहाटणी- ४११०१७

सही/-
कार्यकारी अभियंता (स्था.)
ड क्षेत्रिय कार्यालय (देवगिरी)
रहाटणी- ४११०१७

सही/-
सहा. आयुक्त तथा क्षेत्रीय अधिकारी
ड क्षेत्रिय कार्यालय (देवगिरी)
रहाटणी- ४११०१७

थोडक्यात पण महत्वाचे



सावली निवारा केंद्रातील बेघर व्यक्तीबरोबर आयुक्त डॉ.सुर्यवंशी यांनी केली दिवाळी साजरी

पिंपरी : दैनिक संध्या

दिवाळी म्हणजे आनंद, उत्साह आणि आप्तस्वकीयांसोबत साजरा होणारा जिव्हाळ्याचा सण... मात्र ज्यांच्या आयुष्यात नात्यांची साथ हरवली आहे, ज्यांच्या वाट्याला एकटेपणा आणि निराधारपणाचे दुःख आले आहे, अशा व्यक्तींसाठी सणांचे दिवसही अनेकदा भावनांनी भरलेले असतात. अशाच निराधार माता-पित्यांच्या आयुष्यात मायेचा प्रकाश पसरवण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यंदाची दिवाळी 'सावली' निवारा केंद्रातील ७५ बेघर व्यक्तीसोबत साजरी केली. यावेळी त्यांनी त्यांचेसोबत दिवाळीचा फराळ करत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत आपुलकीचा संवाद साधला. या भेटीदरम्यान अनेकांच्या जीवनप्रवासातील वेदना, संघर्ष आणि सावली केंद्राकडून मिळणारा आधार जाणून घेताना आयुक्त भावूक झाले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या माध्यमातून आणि 'रिअल लाइफ रिअल पीपल' या संस्थेच्या सहकार्याने चालविण्यात येणारे 'सावली' निवारा केंद्र हे बेघर, निराधार आणि वंचित व्यक्तींसाठी हक्काचे घर बनले आहे. रस्त्यावर निराधार अवस्थेत आढळलेल्या, नातेवाईकांपासून दुरावलेल्या, मानसिक व शारीरिक आजारांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींना या केंद्रात सुरक्षित निवारा, अन्न, औषधोपचार आणि मायेची साथ दिली जाते,अनेकांसाठी हे केंद्र केवळ निवाऱ्याचे ठिकाण नसून आयुष्याच्या उत्तरार्धात लाभलेले एक नवे कुटुंबच आहे. आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या केंद्राला भेट देत येथे दिवाळी सण साजरा केला यावेळी उपायुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे एम. ए. हुसैन, व्यवस्थापक गौतम थोरात, समाजसेवक ॲग्नस फ्रान्सिस आदी उपस्थित होते.

थेरगावात दिवाळी फराळ स्नेह मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद..!

पिंपरी : दैनिक संध्या

दिवाळीच्या निमित्ताने स्नेहाचा, आपुलकीचा अन् माणसांच्या भेटीगाठींचा गोड सोहळा म्हणून ओळखला जाणारा 'दिवाळी फराळ स्नेहमेळावा' थेरगाव येथे शनिवारी मोठ्या उत्साहात पार पडला. शिवसेना गटनेते विश्वजित बारणे आणि नगरसेवक नीलेश बारणे यांच्या वतीने आयोजित या स्नेहमेळाव्याला शहरातील नागरिकांचा उत्स्फूर्त व अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. राजकीय, सामाजिक आणि वैयक्तिक भेदाभेदांच्या पलीकडे जाऊन माणसांना एकत्र आणणारा हा मेळावा दिवाळीचा आनंद द्विगुणित करणारा ठरला. अडीच हजाराहून अधिक नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहत फराळाचा आस्वाद घेतला. शहराच्या विविध भागांतून आलेले हजारो नागरिक, विविध राजकीय पक्षांचे ज्येष्ठ नेते, आमदार, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्तींच्या उपस्थितीने हा सोहळा गजबजून गेला होता. यादरम्यान उपस्थितांनी दिवाळीच्या शुभेच्छांची देवाणघेवाण करत मनमोकळ्या गप्पा मारल्या. या स्नेहमेळाव्याला खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, शंकर मांडेकर अमित गोरखे, उमाताई खापरे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार बापूसाहेब पठारे,विलास लांडे, गौतम चाबुकस्वार यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

एक हात मदतीचा.. खरोशीतील गरजू कुटुंबांची दिवाळी झाली 'गोड'!

पिंपरी : दैनिक संध्या


दिवाळीच्या आनंदापासून समाजातील कोणतेही कुटुंब वंचित राहू नये, या भावनेतून भोसरी विधानसभा मतदारसंघाचे भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने खरोशी गावातील गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला. दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या कुटुंबांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळावा, यासाठी अन्नधान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. पुण्यातील मुकुल माधव फाउंडेशन आणि भारतीय जनता पार्टी, भोसरी विधानसभा यांच्या सहकार्याने 'एक हात मदतीचा' हा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत, आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिवाळीच्या तयारीत घरखर्चाची जुळवाजुळव करताना अनेक गरजू कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत त्यांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन अन्नधान्याच्या स्वरूपात मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. या मदतीमुळे संबंधित कुटुंबांच्या घरखर्चाला काही प्रमाणात हातभार लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास, सबका प्रयास' या विचारातून प्रेरणा घेत आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली समाजातील गरजू घटकांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

चाकण नगरपरिषदेच्या वतीने मालमत्ता नोंदीचे सर्वेक्षण सुरू

चाकण : दैनिक संध्या

चाकण नगरपरिषदेच्या वतीने शहरातील सर्व प्रभागांमध्ये मालमत्तांचे चतुर्थ वार्षिक मालमत्ता नोंदीचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. कोअर प्रोजेक्ट प्रा. लि. या संस्थेमार्फत हे सर्वेक्षण केले जात असून, शहरातील सर्व मालमत्ता धारक व नागरिकांनी या मोहिमेत प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव व नगराध्यक्षा मनीषा गोरे यांनी केले आहे. सर्वेक्षणासाठी येणारे नगरपरिषदेचे अधिकृत पथक प्रत्येक मालमत्तेच्या आतील व बाहेरील बाजूने प्रत्यक्ष मोजमाप करणार आहेत. नगरपरिषदेकडे नोंद असलेली कर पावती, ८ अ उतारा, नगरपरिषदेमार्फत घेण्यात आलेली बांधकाम परवानगी, सातबारा उतारा व रजिस्ट्रीची कागदपत्रे, विद्युत सोलर आणि रेन वॉटर हार्वेस्टिंगचे पुरावे, घरगुती कचऱ्याचे घरच्या घरी विघटन करण्याची प्रक्रिया, एसटीपी व इतर संबंधित पुरावे आवश्यक आहेत. अनधिकृत बांधकामांची नोंद चाकण नगरपरिषदेच्या मालमत्ता रजिस्टरला झाली म्हणजे ती मालमत्ता नियमित किंवा अधिकृत होत नाही.अधिकृत व अनधिकृत बांधकाम असलेल्या मालमत्तेच्या नोंदीकरिता आवश्यक कागदपत्रांद्वारे केवळ नोंदणी फी किंवा शुल्क भरूनच नोंद केली जाते.





लक्ष्मीपूजनाच्या रात्री पिंपरी-चिंचवडमध्ये आगीच्या ५० घटना; सुदैवाने जीवितहानी टळली!

■ पिंपरी(दै. संध्या)

लक्ष्मीपूजनाच्या सणाचा उत्साह आणि आनंद शहरात सुरू असतानाच आगीच्या घटनांनी अग्निशमन दलाची चांगलीच धावपळ उडवली. लक्ष्मीपूजनाच्या रात्री पिंपरी-चिंचवड शहरात विविध ठिकाणी आगीच्या तब्बल ५० घटनांची नोंद झाली. फटाक्यांमुळे तसेच अन्य कारणांमुळे या आगी लागल्याचे समोर आले आहे.

आगीच्या एकूण ५० घटनांपैकी सर्वाधिक २५ घटना मोकळी मैदाने, गवत, कचरा आणि झाडांना आग लागण्याच्या होत्या. तर २० ठिकाणी फ्लॅट आणि घरांना आग लागल्याच्या घटना घडल्या. याशिवाय ५ ठिकाणी फ्लेक्स, कंपाउंड आणि टॉवरला आग लागल्याचे समोर आले. लक्ष्मीपूजनाच्या रात्री फटाक्यांची आतषबाजी सुरू असताना आगीच्या घटना घडल्याने अनेक ठिकाणी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घरांना आणि फ्लॅटला आग लागल्याने नागरिकांची मोठी धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. दरम्यान, अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आणि वेळेत केलेल्या कारवाईमुळे सर्व ५० घटनांमध्ये सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, दिवाळीच्या आनंदोत्सवात घडलेल्या या घटनांमुळे फटाके फोडताना तसेच दिवे आणि विद्युत रोषणाई करताना नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

प्लास्टिक गोडाऊनला मध्यरात्री भीषण आग


■ पिंपरी(दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड शहरातील चिखली-कुदळवाडी परिसरात प्लास्टिकच्या गोडाऊनला मध्यरात्री भीषण आग लागल्याची घटना घडली. रविवारी मध्यरात्री २.४९ वाजण्याच्या सुमारास लागलेल्या या आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या दुर्घटनेत गोडाऊनमधील लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले आहे.

आगीने काही वेळातच रौद्र रूप धारण केल्याने गोडाऊनमधील साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले.

घटनेची माहिती मिळताच पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशामक दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत गोडाऊनचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी अथवा दुखापत झालेली नाही.

त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. दरम्यान, ही आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.



लक्ष्मीपूजनाला श्री महालक्ष्मी देवीला सुवर्णसाडी व मुकुट परिधान

■ पुणे (दै. संध्या)

श्री महालक्ष्मी मंदिर, सारसबाग च्या वतीने लक्ष्मीपूजनाच्या दिवशी श्री महालक्ष्मी देवीला १६ किलो सोन्याची साडी आणि सुमारे २ किलो सोन्यापासून तयार करण्यात आलेला रत्नजडित मुकुट परिधान करण्यात आला. वर्षातून दोन वेळा म्हणजेच दसरा आणि लक्ष्मीपूजन या दिवशी देवीला ही साडी परिधान करण्यात येते. त्यामुळे सुवर्णवस्त्रांनी सजलेले हे महालक्ष्मी देवीचे रूप पाहण्यासोबतच दर्शनाकरिता पुणेकरांनी मोठी गर्दी केली.



दिवाळीच्यानिमित्ताने मंदिराचे प्रवेशद्वार आणि सभामंडपासह संपूर्ण मंदिर परिसरात विविध प्रकारची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक आणि विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल, विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी, विश्वस्त व उत्सव प्रमुख डॉ. तृप्ती अग्रवाल, विश्वस्त भरत अग्रवाल, प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर, नारायण काबरा, राजेश सांकला, रमेश पटोदिया, राजकुमार चमडीया, निलेश लद्दड यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी याचे आयोजन केले आहे. प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल म्हणाल्या, हैद्राबाद मध्ये साडीची कलाकुसर साकारण्यात आली असून सुमारे ६ महिने काम सुरु होते. आकर्षक नक्षीकाम करून ही साडी देवीसाठी साकारण्यात आली आहे. तसेच सुमारे २ किलो सोन्याच्या मुकुटावर करण्यात आलेले अतिशय सुबक आणि नाजूक नक्षीकाम हे विशेष लक्षवेधी आहे. पारंपरिक धार्मिक संकल्पना, उत्कृष्ट सुवर्णकारिता आणि कलात्मक सौंदर्य यांचा सुंदर संगम या मुकुटामध्ये पाहायला मिळतो.

कलादालनातर्फे 'सांजधारा व दीपोत्सव' उत्साहात संपन्न

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

येथील खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या कलादालनाच्या वतीने 'सांजधारा व दीपोत्सव' या भव्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले. या निमित्ताने संगीत, कला आणि दीपोत्सवाचा अनोखा संगम उपस्थितांना अनुभवता आला.

या विशेष कार्यक्रमासाठी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अजित लुणावत, प्रदीप कासवा, डॉ. प्रदीप शेवाळे, सुरेखा श्रोत्रीय, बाळासाहेब सांडभोर, राहुल कुंभार, स्वानंद खेडकर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थेअंतर्गत येणाऱ्या महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, इंग्रजी माध्यम विद्यालय आणि शेठ केशरचंद पारख प्राथमिक विद्यालय या तीनही विद्यालयांचे प्राचार्य, अधिकारी, सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे तिन्ही विद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सादर केलेली सुरेल गीते. या सुमधुर गीत सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. ओवी नेहरे आणि अनुष्का थिगळे यांनी सादर केलेल्या नृत्याला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली. दीपोत्सवाचे नियोजन शीला नाईकरे आणि प्रतिपदा गोरडे यांनी केले. संस्थेच्या कलादालन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'सांजधारा' या सांगितिक कार्यक्रमाचे नियोजन अशोक सांडभोर, माधुरी काळभोर आणि योगिनी नगरकर यांनी केले. दोनही कार्यक्रमासाठी प्राचार्या रेखा जाधव, संस्थेचे पदाधिकारी, सर्व अधिकारी वर्ग यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक तुलसीदास घोलप, अर्चना गोडसे, विद्यार्थिनी संयमी भोकसे, नीलजा सांडभोर, स्वराली कातोरे आणि वृषाली गोपाळे यांनी केले.

सलग १५व्या वर्षी अष्टसहस्त्र दीपोत्सवातून शिवरायांना मानवंदना

पुतळ्याचे यंदा १८ व्या वर्षात पदार्पण, पुतळयाचे वजन तब्बल ८००० किलो

■ पुणे (दै. संध्या)

शिवजयंती महोत्सव समिती, पुणे तर्फे दिवाळी पाडवा मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ रोजी संध्याकाळी ६ वाजता "श्री छत्रपती शिवाजी महाराज दीपोत्सव सोहळा" पर्व १५ वे आयोजन श्री शिवछत्रपती स्मारक, एसएसपीएमएस शाळा प्रांगण, शिवाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज नगर येथे करण्यात आले आहे. दीपोत्सवाचे उद्घाटन शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या स्वराज्य घराण्यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी दिली. शिवरायांचे हे जगातील पहिले भव्य अश्वारुढ स्मारक आहे तसेच एकसंघ ओतीव काम केलेले एकमेव स्मारक आहे. राजर्षी छत्रपती शाहु महाराज पुत्र श्रीमंत राजाराम छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली १६ जून १९२८ साली या पुतळ्याचे अनावरण झाले होते. पुतळ्याचे यंदा १८ व्या वर्षात पदार्पण झाले आहे. पुतळयाचे वजन तब्बल ८००० किलो आहे. त्यामुळे प्रत्येक किलोमागे एक पणती अशा ८ हजार पारंपरिक पणत्यांची मानवंदना देण्यात येणार आहे. शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळ्यात पदार्पण केल्याबद्दल सरदार मंबाजी नाईक सोनवणे, सरदार थोरात, सरदार वाबळे या स्वराज्यघराण्यांचा दीपोत्सवाचे सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

दीपोत्सव सोहळ्याचे आयोजन दीपोत्सवाचे संकल्पक समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, रवींद्र कंक, सचिन पायगुडे, शंकर कडू, समीर जाधवराव, निलेश जेधे, गोपी पवार, प्रवीण गायकवाड, मोहन पासलकर, किरण शितोळे, महेंद्र भोईटे, विशाल गव्हाणे, निलेश जगताप यांसह असंख्य स्वराज्यबांधवांनी केले आहे. तरी पुणेकरांनी मोठया संख्येने या अनोख्या नेत्रदिपक दीपोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



इंदु इंग्लिश स्कूलमध्ये साकारली रोहिडा किल्ल्याची भव्य प्रतिकृती

जेजुरी : दैनिक संध्या

कडेपठार ग्रामीण वैद्यकीय व संशोधन प्रतिष्ठान संचलित इंदु इंग्लिश स्कूल, कोळविहिरे येथे दीपावली निमित्त धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन व्हावे, तसेच महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या हेतूने रोहिडा किल्ल्याची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली. इंदू इंग्लिश स्कूल मध्ये धार्मिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन व्हावे, तसेच महाराष्ट्राच्या गड-किल्ल्यांचा गौरवशाली इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचावा, या हेतूने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामदास कुटे यांनी गड किल्ल्यांचा उपक्रम सुरू केला .त्यांच्या संकल्पनेतून व गेल्या दहा वर्षांपासून विद्यालयात जंजिरा, शिवनेरी, तिकोना, पन्हाळा, राजगड, पुरंदर, सिंहगड, प्रतापगड अशा ऐतिहासिक किल्ल्यांच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या आहेत. विद्यालयाचे कलाशिक्षक मनोज सोनवणे आणि विद्यार्थी यांच्या मेहनतीतून व कल्पकतेतून रोहिडा किल्ला साकारला आहे. दगड, माती, गोणपाट आणि टाकाऊ वस्तूंचा कल्पक वापर करून तब्बल २० बाय १० फूट आकाराची रोहिडा किल्ल्याची भव्य प्रतिकृती साकारण्यात आली आहे. किल्ल्याची रचना, ऐतिहासिक वास्तू आणि बारकावे यांमधून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून इतिहास समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. इंदू इंग्लिश स्कूल मध्ये यावेळी आयोजित दीपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या दीपोत्सवाचे उद्घाटन संस्थेच्या संस्थापिका श्रीमती इंदुमती कुटे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक आकाशकंदील, पणत्या, भेटकार्ड्स तसेच विविध कलात्मक वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली होती. या प्रदर्शनाला पालक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. रामदास कुटे , पुरंदर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष माणिकराव झेंडे पाटील, संस्थेच्या सचिव डॉ. मोनाली कुटे , प्राचार्य पुरुषोत्तम रोटेतसेच विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

दिवाळीत फराळाचा आस्वाद घेताना आरोग्याची काळजी घ्या : डॉ. गेठे



चाकण : दैनिक संध्या

तळलेले पदार्थ, साखर व तुपाचे अतिसेवन टाळणे अपेक्षित असून, दिवाळी फराळाचा आस्वाद घेताना प्रत्येकाने आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. अश्विनीताई गेठे यांनी येथे व्यक्त केले. डॉ. गेठे यांनी पुढे सांगितले की, पारंपारिक फराळातील घटक पौष्टिक असले तरी प्रत्येक पदार्थ आरोग्यदायी असेलच असे नाही. मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा व हृदयविकार असलेल्यांनी आहारावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. आयुर्वेदातील मात्रावत आहार घेण्याचे सत्व पाळल्यास दिवाळीचा आनंद घेतानाच आरोग्याचीही काळजी घेता येईल. भारतीय आयुर्वेदिक परंपरेत अनेक अन्न घटकांना महत्त्वाचे प्रचंड स्थान आहे. महिलांनी कोणताही आजार अंगावर सहन न करता डॉक्टरांचा सल्ला घेणे अपेक्षित आहे. आयुर्वेदात आहाराला आरोग्याचा महत्त्वाचा आधार मानला जातो. ऋतू, प्रकृती, वय, पचनशक्ती आणि भूक यांचा विचार करून आहार घेण्यावर भर दिला पाहिजे. दिवाळीचा काळ हा थंडीची चाहूल लागण्याचा असतो. यात पचनशक्ती म्हणजेच जठराग्नी, तुलनेने चांगला असू शकतो. त्यामुळे पौष्टिक व तुलनेने स्निग्ध पदार्थांचा मर्यादित प्रमाणात आहार समावेश करण्याची परंपरा आहे. महिलांच्या आयुष्यात विशेष करून धोके जास्त असल्याने आरोग्याकडे दुर्लक्ष करणे भविष्यातील धोक्याची घंटा आहे. दिवसभर उपाशी राहून एकाच वेळी भरपूर जेवण करणे हे धक्कादायक आहे. रक्तदाब असलेल्या व्यक्तींनी विशेष खबरदारी घेणे आवश्यक असून दिवाळीचा आनंद घेताना आरोग्याचीही सर्वांनी काळजी घेतली पाहिजे असा सबुरीचा सल्ला डॉ. अश्विनीताई गेठे यांनी दिला आहे.



खोर विविध कार्यकारी संस्थेच्या चेअरमनपदी चौधरी यांची बिनविरोध निवड

दौड : दैनिक संध्या

दौंड मधील मोठ्या विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या खोर येथील सेवा संस्थेच्या चेअरमन पदी जेष्ठ कार्यकर्ते रामदास चौधरी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. दौंड येथील शहाय्यक निबन्धक (सहकारी संस्था) कार्यालयात खोर विविध कार्यकारी संस्था संचालक मंडळ चेअरमन निवडणूक सभेत रामदास चौधरी यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी शिंदे यांनी चौधरी यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी खोर विकाससंस्थेचे सचिन बाळासाहेब वाघमोडे यांनी निवडणूक प्रक्रियेस सहकार्य केले. नव निर्वाचित चेअरमन रामदास चौधरी यांचा उपस्थित संचालक यांचे वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खोर विकासाचे सर्व आजी संचालक, चेअरमन, माजी सरपंच मोहन चौधरी, दौंड मार्केट कमिटीचे माजी सभापती महादेव यादव यांचेसह कार्यकर्ते उपस्थित होते. चौधरी हे जेष्ठ कार्यकर्ते असून त्यांनी तालुका पातळीवरील सहकारी संस्थेत जबाबदार पदाधिकारी म्हणून काम केले आहे. माजी आमदार आणि जिल्हा बँकेचे जेष्ठ संचालक रमेश थोरात यांचे ते कट्टर समर्थक असून रमेश थोरात यांनी त्याचा सत्कार केला आहे. दौंड तालुक्यातून चौधरी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



१३० कातकरी कुटुंबांना दिवाळी फराळ व कपड्यांचे वाटप

■ राजगुरुनगर(दै. संध्या)

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या राजगुरुनगर येथील 'हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशन, ' च्या वतीने खेड तालुक्यातील दुर्गम पश्चिम पट्ट्यातील आदिवासी व कातकरी कुटुंबांना दिवाळी फराळ व कपड्यांचे वाटप करण्यात आले.हुतात्मा राजगुरू सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून गेली ७ वर्षे राबविण्यात येत असलेला उपक्रम यंदाही दिवाळी फराळ व कपडे वाटप या उपक्रमांतर्गत डेहने येथील कातकरी वस्ती, शिरगांव येथील कातकरी वस्ती परिसरातील सुमारे १३० कातकरी बंधू-भगिनी कुटुंबाला दिवाळीचा आनंद मिळवून देण्यात आला. या सामाजिक उपक्रमासाठी फाउंडेशनच्या सर्व संचालकांनी वैयक्तिक स्वरूपात आर्थिक मदत केली. तसेच राजगुरुनगर शहरातील दानशूर व्यक्ती व देणगीदारांकडून गोळा झालेल्या निधीतून व वस्तूंमधून ही मदत सुपूर्द करण्यात आली.

या प्रसंगी स्कोडा, व्होल्स वॅगन कंपनीचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी हुतात्मा राजगुरु सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, उपाध्यक्ष नाझनीन शेख, सचिव अमर टाटीया, संचालक ॲड. मनिषा पवळे, संतोष सांडभोर, सुनिल वाळुंज, दिलीप होले, राहुल मलघे, आकाश बोंबले, संतोष पाचारणे उपस्थित होते.



ॲड. पानमंद व ॲड. थिगळे यांची कायदेशीर सल्लागारपदी नियुक्ती

■ राजगुरुनगर (दै. संध्या)

खेड तालुका वकील संघाचे माजी अध्यक्ष तथा पुणे जिल्हा लॉयर्स कंझ्युमर को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे संचालक ॲड. संजय सुदामराव पानमंद व खेड बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. दिपक गुरव यांची पुणे जिल्हा परिषदेच्या कायदेशीर सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल विधी, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवलबाबा जगदाळे, खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील आणि पुणे जिल्हा परिषद सदस्या सुनीता शरद बुट्टे-पाटील यांच्या हस्ते या दोघांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

दरम्यान, खेड जिल्हा व सत्र न्यायालयात आयोजित कार्यक्रमात खेड जिल्हा व सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश ए. एस. सय्यद आणि ए. पी. कानडे यांच्या उपस्थितीत तसेच खेड वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अतुल गोरडे यांच्या वतीने खेड वकील संघाच्या सदस्यांनी या दोघांचा विशेष सन्मान केला.

या निवडीमुळे त्यांचे परिसरातून अभिनंदन होत आहे.

चाकणमध्ये मंगळवारी रंगणार सुरेल गीतांची दिवाळी पहाट

■ चाकण (दै. संध्या)

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानच्या वतीने दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून भाऊंची आठवण या संकल्पनेतून चाकण येथे मंगळवारी (दि.१०) सुरेल गीतांची दिवाळी पहाट रंगणार आहे.

कलाविष्कार मंच व संगीतयात्री एक मैफिल यांच्या निर्मितीतून मंगळवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत दिवाळी पहाट या बहारदार गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विशाल शेलार, दिक्षा वाव्हळ, प्रथमेश साळुंखे, पूजा वाडेकर व सृष्टी नेटके हे कलाकार संगीतप्रेमींना सुरेल गीतांची मेजवानी देणार आहेत.



तसेच सकाळी १० वाजता कलाविष्कार मंचच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. प्रारंभी स्व.आ. सुरेश भाऊ गोरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

येथील स्व.आ. सुरेशभाऊ गोरे जनसंपर्क कार्यालयात वरील नियोजित दिवशी या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले असल्याची माहिती चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे प्रतिष्ठानचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे यांनी दिली. नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन उद्योजक मनोहर शेवकरी, प्राचार्या प्रमिला गोरे, विशाल बारवकर, नारायण करपे, विकास गोरे, ओंकार गोरे आदींनी केले आहे.

चाकणमध्ये मंगलमय वातावरणात घरोघरी लक्ष्मीपूजन

■ चाकण (दै. संध्या)

दिवाळी सणातील अत्यंत महत्त्वाचा आणि मंगलमय मानला जाणारा लक्ष्मीपूजनाचा उत्सव चाकण शहरात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

लक्ष्मीपूजनानिमित्त शहरातील घरोघरी तसेच विविध व्यापारी, प्रतिष्ठान, दुकाने आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये माता लक्ष्मी व भगवान श्री गणेश यांचे विधिवत पूजन करण्यात आले. सुख, समृद्धी, ऐश्वर्य आणि व्यवसायात भरभराट लाभावी, यासाठी नागरिकांनी श्रद्धेने देवाला प्रार्थना केली. या निमित्ताने नागरिकांनी आपल्या घरांची आकर्षक सजावट केली होती. घरांसमोर सुंदर रांगोळ्या काढल्या होत्या,



तर आकाशकंदील, पणत्या आणि विद्युत रोषणाईने घरे उजळून निघाली होती.

चाकण शहरातील व्यापारी वर्गानेही आपल्या दुकानांमध्ये लक्ष्मीपूजन करून हिशेबाच्या वह्यांचे आणि व्यवसायातील साहित्याचे विधीवत पूजन केले. व्यापा-यांनी आकर्षक सजावट केली होती. सायंकाळी दिव्यांच्या रोषणाईने संपूर्ण चाकण शहरात उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरण निर्माण झाले होते. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी आपल्या कुटुंबीयांसमवेत लक्ष्मीपूजनाचा आनंद लुटला.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे व त्यांच्या परिवाराने व्यवसायाचे परंपरागत लक्ष्मीपुजन ब्राह्मण काका पाटील यांच्या मंत्रोपचाराने केले. यावेळी कर्मचाऱ्यांना दीपावली फराळ व बोनस वाटप करण्यात आला. याप्रसंगी उद्योजक विकास गोरे, ओंकार गोरे, प्रमिला गोरे, कल्याणी घोरपडे, निकिता गोरे, कौस्तुभ गोरे, रुद्रवर्धन गोरे, शुभदा गोरे, स्वरा गोरे आदी उपस्थित होते. श्रद्धा, परंपरा आणि आनंदाचा संगम असलेल्या लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने चाकण शहरात सर्वत्र दिवाळीचा उत्साह आणि भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले.

ऊस गाळप हंगामापूर्वी १६२ साखर कारखान्यांचे वजनकाटे सील

■ पुणे (दै. संध्या)

राज्यात यंदाच्या २०२६-२७ च्या ऊस गाळप हंगामात प्रादेशिक साखर सहसंचालकांच्या नियोजनातून सहकारी व खासगी मिळून आत्तापर्यंत १६२ कारखान्यांच्या वजनकाट्यांची पडताळणी, मुद्रांकन (स्टॅम्पिंग) व सीलिंग प्रक्रिया वैधमापन शास्त्र विभागामार्फत करण्यात आलेली आहे.

उर्वरित कारखान्यांची प्रक्रिया नियोजनानुसार सुरू असून, ऊस वजनमापांचे कामकाज पारदर्शक ठेवण्यासाठी प्राधान्याने काम सुरू असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, उसाच्या वजनकाट्यांच्या तक्रारींसाठी जिल्हानिहाय तक्रार निवारणासाठी वैध मापनशास्त्र विभागाकडून व्हॉट्सॲप क्रमांकही जाहीर करण्यात आल्याचे साखर आयुक्तालयातून सांगण्यात आले.

त्यामुळे उसाच्या काटामारीबाबतच्या शेतकरी संघटनांकडून होत असलेल्या तक्रारींची दखल घेऊन कामकाज सुरू करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्यातील यंदाच्या हंगामासाठी ऊस गाळप करण्याकामी साखर आयुक्तालयाकडे एकूण २१४ साखर कारखान्यांनी प्रस्ताव दाखल केले आहेत. त्यातून २०० कारखान्यांना ऑनलाईनद्वारे परवानेही वितरितही करण्यात आले आहेत.

चाकण मार्केटमध्ये झेंडूच्या फुलांची विक्रमी आवक

■ चाकण (दै. संध्या)

देशभरात आणि विशेषतः महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात दीपावली साजरी होत आहे. या सणांच्या पार्श्वभूमीवर खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केट यार्ड मधील उप बाजारात झेंडूच्या फुलांची विक्रमी आवक झाली. चाकण बाजारपेठ झेंडूच्या फुलांनी बहरली असून, संपूर्ण परिसर फुलून गेला आहे. बाजारपेठ पूर्णपणे पिवळी धमक दिसू लागली आहे. दिवाळीमुळे घराघरांमध्ये, वाहनांवर, दुकानांवर आणि कार्यालयांमध्ये झेंडूच्या फुलांच्या माळा व देव देवतांची पूजा करण्याची मोठी परंपरा आहे. शस्त्र, हत्यारे आणि वाहनांच्या पूजेसाठी झेंडूला प्रचंड मागणी आहे. या मागणीची पूर्तता करण्यासाठी खेड तालुक्यासह आसपासच्या भागातील शेतकऱ्यांनी आपला शेतमाल चाकण बाजारात विक्रीसाठी आणला होता, असे खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक महेंद्र गोरे, व्यापारी रवींद्र बोराटे व धनंजय बोराटे यांनी सांगितले. झेंडूच्या फुलांची आवक मोठ्या प्रमाणावर झाली असली, तरी भाव तेजीत आहेत. बाजारात झेंडूच्या फुलांना चांगली मागणी असून, प्रतवारीनुसार झेंडूला प्रति किलो ४० रुपये असा दर मिळत आहे. सणासुदीचे दिवस असल्याने दर वाढले असले तरी खरेदीचा उत्साह दिसून येत आहे. यंदाच्या हंगामात पावसाची स्थिती आणि इतर कारणांमुळे फुल उत्पादक शेतकरी चिंतेत होते.



थोडक्यात पण महत्वाचे



शिरूर पोलिसांची अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी कारवाई!

कवठे येमाई: दैनिक संध्या

शिरूर शहरात अंमली पदार्थांची अवैध विक्री व तस्करी करणाऱ्यांविरोधात शिरूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. मार्केट यार्डच्या मागील बाजूस असलेल्या साईनगर परिसरात छापा टाकून गांजा विक्रीप्रकरणी दोन तरुणांना अटक करण्यात आली आहे. तर या प्रकरणातील मुख्य आरोपी आशुतोष मिलिंद काळे हा फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. दि. ५ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. यामध्ये उत्कर्ष जालिंदर ढेरे (वय २१, रा. बाभुळसर खुर्द, ता. शिरूर) आणि साई संतोष ससाणे (वय २०, रा. हुडको कॉलनी, शिरूर) या दोघांना पोलिसांनी अटक केली.पोलिसांनी केलेल्या तपासात मुख्य आरोपी आशुतोष काळे याने स्वतःच्या राहत्या घरात गांजा साठवून ठेवला होता. त्यापैकी काही गांजा विक्रीसाठी उत्कर्ष ढेरे व साई ससाणे यांच्याकडे दिल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी घराची व संबंधित ठिकाणांची तपासणी करून मोठ्या प्रमाणात गांजा आणि इतर साहित्य जप्त केले.या कारवाईत आशुतोष काळे याच्या घरातून १ किलो ८०९ ग्रॅम, उत्कर्ष ढेरे याच्याकडून १२२ ग्रॅम, साई ससाणे याच्याकडून ८० ग्रॅम, तर ॲक्टिव्हा मोटारसायकलच्या डिक्कीतून ४०३ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. याशिवाय दोन आयफोन, एक वनप्लस मोबाईल, गांजा पॅकिंगसाठी वापरण्यात येणाऱ्या ९९ रिकाम्या प्लास्टिक पिशव्या आणि वजनकाटा हस्तगत करण्यात आला. या कारवाईत एकूण २ किलो ४१४ ग्रॅम गांजासह सुमारे २ लाख ७१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.याप्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोघांना अटक करण्यात आली असून फरार मुख्य आरोपीचा शोध सुरू आहे.ही कारवाई शिरूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक विनोद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजीराव भोसले व त्यांच्या पथकाने केली. पोलीस कॉन्स्टेबल ए. एस. माने यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक टेंगले करीत आहेत.अंमली पदार्थांच्या अवैध विक्री व तस्करीला आळा घालण्यासाठी शिरूर पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अशा अवैध धंद्यांबाबत नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी,असे आवाहन शिरूर पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

पुणे-अहिल्यानगर महामार्गालगत अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

कवठे येमाई: दैनिक संध्या

पुणे-अहिल्यानगर महामार्गावरील बोऱ्हाडेमळा, न्हावरा फाटा परिसरात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिरूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.रविवार, दि. ८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी सुमारे साडेसात वाजण्याच्या सुमारास न्हावरा फाटा येथील लक्ष्मी मार्ट किराणा दुकाना शेजारी महामार्गालगत एक व्यक्ती बेशुद्ध अवस्थेत पडल्याची माहिती दुकानमालक रितेश एकनाथ आवटे यांना मिळाली. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता संबंधित व्यक्ती कोणतीही हालचाल करीत नसल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच शिरूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. संबंधित इसमाला खासगी रुग्णवाहिकेद्वारे ग्रामीण रुग्णालय, शिरूर येथे दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती रात्री ९:४० वाजण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत इसमाचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून त्याने पांढऱ्या रंगाचा पूर्ण बाह्यांचा शर्ट व काळ्या रंगाची पँट परिधान केली आहे. त्याची दाढी व डोक्याचे केस वाढलेले आहेत. अद्याप त्याची ओळख पटलेली नाही.या प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, संबंधित व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास शिरूर पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रभारी अधिकारी विनोद पाटील, पोलीस निरीक्षक,शिरूर पोलीस स्टेशन यांनी केली आहे

दर्शनाला निघालेल्या भाविकांच्या कारचा शेटफळजवळ अपघात

सोलापूर : दैनिक संध्या

पुणे-सोलापूर महामार्गावरील मोहोळ तालुक्यातील शेटफळ ते तेलंगवाडी गावादरम्यान कार आणि कंटेनरचा भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेली कार समोर जात असलेल्या कंटेनरला जोरात धडकली. या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार भारंबे कुटुंबीय अक्कलकोटला देवदर्शनासाठी शुक्रवारी सकाळी कल्याणहून निघाले होते. दुपारी ४ च्या सुमारास मोहोळ तालुक्यातील शेटफळजवळ कंटेनरला धडक दिल्याने ही दुर्दैवी घटना घडली. दरम्यान जखमी रुग्णांना खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या अपघातात आठ वर्षाच्या चिमुकल्यासह तिघांचा जागीच मृत्यू तर अन्य दोन जण अपघातात गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. मृत्तांमध्ये पार्थ तुषार भारंबे (वय ८), विलास चांगु भारंबे (वय ६६) आणि शोभा विलास भारंबे (वय ६३) अशी मृत लोकांची नावे समोर आली आहेत. तुषार विलास भारंबे आणि पूनम तुषार भारंबे हे पती-पत्नी जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद मोहोळ पोलिस ठाण्यात झाली आहे. अपघाताची माहिती मिळताच मोहोळचे पोलिस घटनास्थळी दाखल झाले होते.

ट्रॅक्टर ट्रॉलीला ट्रकची पाठीमागून धडक; बीडचे पाच ऊसतोड कामगार गंभीर जखमी

सोलापूर : दैनिक संध्या

सोलापूर - ट्रॅक्टर ट्रॉलीला भरधाव वेगात जात असलेल्या ट्रकने पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत पाच ऊसतोड कामगार गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात शनिवार ७ नोव्हेंबर रोजी सोलापूर-विजयपूर महामार्गावर समशापूर ब्रिजजवळ घडला. अंकुश रामा राऊत (वय ३६, रा. लालवंडी, ता. जि. बीड),, कार्तिक अंकुश राऊत (वय ९), माया भाऊसाहेब जाधव (वय ४०), सागरबाई मोहन राठोड (वय ४५) व भाऊसाहेब असुब जाधव (वय ४२) अशी जखमी झालेल्या ऊसतोड कामगारांची नावे आहेत. याबाबत पोलिसांनी सांगितले की, शनिवार ७ नोव्हेंबर रोजी ऊसतोड कामगार हे सोलापूर ते विजयपूर महामार्गावरून ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये बसून दक्षिणमधील साखर कारखान्याच्या दिशेने जात होते. याचवेळी भरधाव वेगात आलेल्या ट्रकने ट्रॉलीला पाठीमागून जोराची धडक दिली. या धडकेत ट्रॅक्टरमध्ये बसलेल्या ऊसतोड कामगारांना जोराचा धक्का बसला. यात कामगारांच्या हाता-पायास, तोंडास, छातीस, कमरेस, खांद्यास, डोळ्यास, डोक्यास जबर मार लागल्याने नातेवाईक किरण राठोड यांनी हायवेवरील रुग्णवाहिकेच्या मदतीने शासकीय रुग्णालय, सोलापूर येथे दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. जखमींवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



चाकणला पार्किंगच्या समस्येमुळे वाहनचालक हैराण

■ चाकण(दै. संध्या)

दिवाळी सणामुळे चाकण शहरात वाहनांची प्रचंड गर्दी झाल्याने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत दाखल झालेले नागरिक आणि पुणे-नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्याने शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अनेक नागरिकांना या वाहतूक कोंडीत तासनतास अडकून पडावे लागले.

चाकण शहरातील महात्मा फुले चौक आणि माणिक चौक या प्रमुख ठिकाणी दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. रस्त्याच्या दुतर्फा असलेली दुकाने, खरेदीसाठी आलेल्या नागरिकांची वाहने आणि वाढलेली वर्दळ यामुळे मुख्य रस्त्यांवरील वाहतुकीचा वेग मंदावला होता. काही ठिकाणी वाहनचालकांना पुढे जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत होती. चाकण हे व्यापारी केंद्र असल्याने दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये महामार्गावरील वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली होती.

पुण्याकडून नाशिककडे तसेच नाशिककडून पुण्याकडे जाणाऱ्या लहान-मोठ्या वाहनांसह अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे महामार्गावरील वाहतूकही संथ झाली होती. त्याचा परिणाम शहरातील अंतर्गत रस्त्यांवरही जाणवत होता.

वाहतूक कोंडी नियंत्रणात आणण्यासाठी चाकण वाहतूक विभागाचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी विविध चौकांमध्ये तैनात होते. वाहनांची मोठी संख्या आणि नागरिकांची गर्दी लक्षात घेता वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागत होती. काही ठिकाणी स्थानिक दुकानदार आणि नागरिकांनीही वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहकार्य केले."



दिवाळीसारख्या मोठ्या सणांच्या काळात चाकण शहरातील बाजारपेठेत आणि महामार्गावर वाहनांची गर्दी होणे ही दरवर्षीची समस्या बनत आहे. या वाहतूक कोंडीमुळे स्थानिक नागरिक, व्यापारी, ग्राहक तसेच महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महात्मा फुले चौक, माणिक चौक आणि पुणे-नाशिक महामार्गावरील प्रमुख वाहतूक मार्गांवर सणासुदीच्या काळात अतिरिक्त वाहतूक पोलीस कर्मचारी तैनात करणे, वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करणे, नो-पार्किंग नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि बाजारपेठेतील पार्किंग व्यवस्थेचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

"चाकण शहरातील वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि व्यापारी वर्दळ लक्षात घेता केवळ सणासुदीपुरते नव्हे, तर वर्षभरासाठी प्रभावी आणि कायमस्वरूपी वाहतूक नियोजन करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे." " दिवाळीच्या खरेदीसाठी आलेल्या नागरिकांमुळे चाकणमध्ये तुफान वाहतूक कोंडी होत आहे.

याचा ताण वाहतूक पोलिसांवर येत असून, सर्वसामान्य नागरिकांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पोलीस यंत्रणा वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सक्षम असून, ही कोंडी मार्गी लावण्यासाठी चाकण मध्ये वाहनतळ आवश्यक आहे." - दीपक गोसावी, पोलीस निरीक्षक, चाकण वाहतूक विभाग.,

"चाकणमध्ये रिक्षाचालकांची मोठ्या प्रमाणात मनमानी सुरू आहे. वाहतूक कोंडीला निमंत्रण देण्यात रिक्षाचालकच जबाबदार आहेत. नियमांपेक्षा जास्त प्रवासी रिक्षात कोंबून अपघाताला निमंत्रण देणाऱ्या रिक्षाचालकांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे, मंगेशभाऊ कांडगे, नगरसेवक असे यांनी सांगितले.

२०२४ च्या निवडणुकीत काँग्रेसचे ७५, महाविकास आघाडीचे १६० आमदार निवडून येण्याचा आयबीचा रिपोर्ट होता: नाना पटोलेंचा स्फोटक दावा

■ अकोला (दै. संध्या)

"२०२४ मध्ये राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येणार होते. काँग्रेसचे ७५ आमदार निवडून येणार असा रिपोर्ट गुप्तचर यंत्रणेने सरकारला दिला होता", असा स्फोटक दावा काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. अकोला जिल्ह्यातील बाळापूरमध्ये एका कार्यक्रमात बोलताना नाना पटोले यांनी हा दावा केला.

नाना पटोले म्हणाले, "राज्यात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार येणार होते. काँग्रेसच्या ७५ आमदारांसह महाविकास आघाडीचे १६० आमदार निवडून येणार आहेत, असा गोपनीय अहवाल इंटेलिजन्स ब्युरोने सरकारला दिला होता." महाविकास आघाडीचे सरकार येऊ नये म्हणून कट



"मतदानाच्या दिवशी संध्याकाळी पाचनंतर वाढलेल्या मतदानाच्या बोगस आकेडवारीतून राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येण्यापासून रोखण्याचा कट शिजला", असा गंभीर आरोप नाना पटोले यांनी केला.

नाना पटोले म्हणाले की, "काँग्रेस पक्ष सोडून गेलेले देशातील पाच माजी मुख्यमंत्री परत घरवापसी करणार आहे. त्यात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या नावाचीही चर्चा सुरू आहे. देशातील वातावरण बदलायला सुरूवात झाली आहे. अनेक जण आता काँग्रेसच्या मूळ प्रवाहात येण्यास उत्सुक आहेत. अशोक चव्हाण आणि इतर नेत्यांच्या काँग्रेसमध्ये परतण्याच्या मुद्द्यावर हायकमांडवर निर्णय घेणार आहेत." रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात ३०० मेगावॅट जलविद्युत प्रकल्पासाठी वृक्षतोड सुरू झाली आहे. पटोले म्हणाले, "३५ हजारांपेक्षा जास्त झाडे कापली जाणार असल्याचा दावा केला जात आहे.

फायनान्स कंपनीने सील केलेले शेतकऱ्याचे घर कुलूप तोडून उघडले

■ अकोला (दै. संध्या)

दुष्काळामुळे शेती उद्ध्वस्त झालेली असताना कर्जाच्या थकबाकीपोटी फायनान्स कंपनीने थेट घराला सील ठोकल्याने एका शेतकरी कुटुंबाला रात्र उघड्यावर काढावी लागल्याचा संतापजनक प्रकार अकोल्यात समोर आला.

बाळापूर तालुक्यातील निंबा गावातील या घटनेची माहिती मिळताच आमदार बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेत कार्यकर्त्यांसह गावात धाव घेतली आणि फायनान्स कंपनीने लावलेले कुलूप स्वतः तोडून घराचा ताबा पुन्हा त्या शेतकरी कुटुंबाला मिळवून दिला. "गुन्हे दाखल करायचे असतील तर आधी माझ्यावर करा," असा इशारा बच्चू कडू यांनी फायनान्स कंपनी आणि प्रशासनाला दिला. कुलूप तुटून घराचे दार उघडताच शेतकरी कुटुंबाला अश्रू अनावर झाले. निंबा गावातील अल्पभूधारक शेतकरी गोपाल राठोड यांच्याकडे फक्त दोन एकर शेती आहे. नापिकी आणि दुष्काळामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाल्याने त्यांची आर्थिक स्थिती खालावली होती. २०१८ मध्ये त्यांनी 'महिंद्रा रुरल हाउसिंग फायनान्स' कंपनीकडून १ लाख रुपयांचे गृहकर्ज घेतले होते. त्यापैकी ४४ हजार रुपयांची परतफेडही त्यांनी प्रामाणिकपणे केली होती.

सांगलीतील अनिकेत कोथळे खून खटल्याचा २० रोजी निकाल

■ सांगली(दै. संध्या)

अनिकेत कोथळे खून खटल्यात विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी शुक्रवारी अंतिम युक्तिवाद केला. त्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.आर. पडवळ यांनी निकालासाठी दि. २० नोव्हेंबर ही तारीख दिली आहे. त्यामुळे या निकालाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

अनिकेत कोथळे खून खटल्यात यापूर्वी सरकारतर्फे ३७५ पानांचा लेखी युक्तिवाद सादर करण्यात आला आहे. त्यानंतर शुक्रवारी ॲड. निकम यांनी तोंडी युक्तिवाद केला. नऊ वर्षांपूर्वी दि. ६ नोव्हेंबर २०१७ रोजी अनिकेत कोथळे याचा आरोपींनी पोलिस कोठडीत हेतुपुरस्सर खून करून त्याच्या प्रेताची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट केला आहे. या खटल्याचा लवकर निकाल द्यावा असे ॲड. निकम यांनी सांगितले.

खटल्यात तोंडी युक्तिवाद पूर्ण केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ॲड. निकम म्हणाले, अनिकेत कोथळे हा खून खटल्याची प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, परिस्थितीजन्य पुरावा व वैज्ञानिक पुरावा यावर भिस्त आहे. खटल्यात ३५ साक्षीदार तपासले आहेत. गेली ९ वर्षे हा खटला सुरू आहे. दोन वर्षे कोविड काळात कामकाज प्रलंबित राहिले. त्यानंतर आरोपींनी वेळकाढूपणाचे धोरण अवलंबले. त्यामुळे सुनावणी लांबली आहे. आता सरकारतर्फे लेखी व तोंडी युक्तिवाद पूर्ण झाला आहे.

डीजेचे सेटिंग करताना विजेचा धक्का लागल्याने युवकाचा मृत्यू

■ अकोला (दै. संध्या)

हातरुण-निमकर्दा मार्गावरील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ मंगळवारी (दि. २०) रात्री ८ वाजताच्या सुमारास विजेचा धक्का लागल्याने २४ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला; तर सहा जण जखमी झाले. अविनाश जानराव डोंगरे (२४, रा. हातरुण) असे मृत युवकाचे नाव आहे.

या घटनेत रोहित माणिक डोंगरे (२२), जय तेजराव डोंगरे (१७), रुपेश नंदलाल डोंगरे (१७), आशिष गजानन डोंगरे (१९), विश्वजित प्रवीण डोंगरे (१७) आणि हर्षवर्धन गोंडुराम डोंगरे (२२, सर्व रा. हातरुण) हे जखमी झाले. घटनेनंतर उपस्थितांनी सर्व जखमींना अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अविनाश डोंगरे याला मृत घोषित केले.

जखमींपैकी जय डोंगरे याची प्रकृती गंभीर असून, सर्वांवर उपचार सुरू आहेत. मिरवणुकीत वाजविण्यासाठी मालवाहू गाडीवर डीजे लावण्याची तयारी सुरू असताना वरील वीज तारेला स्पर्श झाल्याने ही दुर्घटना घडल्याची माहिती उरळ पोलिसांनी दिली. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी कोणतीही तक्रार दाखल झाली नव्हती.



मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरसह विविध मार्गांवर २४ अतिरिक्त सेवा

■ मुंबई (दै. संध्या)

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूरला जाणाऱ्या अनुयायांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने २४ विशेष रेल्वेसेवा चालविण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक रोड, अकोला आणि भुसावळ या मार्गांवर १८ ते २२ ऑक्टोबरदरम्यान आरक्षित आणि अनारक्षित विशेष गाड्या धावणार आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९५६ मध्ये आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ साजऱ्या होणाऱ्या धम्मचक्र प्रवर्तन दिनासाठी नागपूरला जाणाऱ्या प्रवाशांना या अतिरिक्त सेवांचा लाभ घेता येणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून गाडी क्रमांक ०१२१९ ही १८ ऑक्टोबरला, तर ०१०१९ ही १९ आणि २१ ऑक्टोबरला दुपारी २.३० वाजता सुटेल. दोन्ही गाड्या दुसऱ्या दिवशी सकाळी ६.१० वाजता नागपूरला पोहोचतील. परतीसाठी गाडी क्रमांक ०१२२० ही १९ ऑक्टोबरला, तर ०१०२० ही २० आणि २२ ऑक्टोबरला रात्री १०.३० वाजता नागपूरहून सुटेल. या गाड्या दुसऱ्या दिवशी सायंकाळी ५.२० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे पोहोचतील.

पुणे-नागपूर विशेष गाडी १९ आणि २१ ऑक्टोबरला, तर परतीची गाडी २० आणि २२ ऑक्टोबरला धावेल. सोलापूरहून नागपूरसाठी १९ ऑक्टोबरला आणि परतीसाठी २० ऑक्टोबरला विशेष गाडी चालविण्यात येईल.

नागपूर-अकोला मार्गावर २० आणि २१ ऑक्टोबरला, तर परतीच्या दिशेने २१ आणि २२ ऑक्टोबरला गाड्या धावतील. नागपूर-भुसावळ मार्गावरही याच तारखांना विशेष सेवा उपलब्ध असेल. याशिवाय नाशिक रोड-नागपूर मेमू विशेष गाड्या १८ आणि २० ऑक्टोबरला, तर परतीच्या गाड्या १९ आणि २१ ऑक्टोबरला चालविण्यात येतील.

दरम्यान, नागपूर-अकोला विशेष गाडीचे आरक्षण संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच आयआरसीटीसी या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अनारक्षित गाड्यांची तिकिटे यूटीएस प्रणाली किंवा रेलवन ॲपद्वारे काढता येतील



शुभ दिपावली

दिपावली निमित्त हार्दिक शुभेच्छा

Global WaWes Media

Sachin P. Barange | Shraddha Barange
Mobile: 8796786456 | 9850325098

GLOBAL WAWES MEDIA

Office Address: Delux Palm, Row House No. 07, Mauli Nagar, Beed Bypass, Chhatrapati Sambhajinagar – 431007, Maharashtra.

Our Branches & Service Locations:
Akola | Amravati | Latur | Satara | Sangli | Solapur | Ahmednagar | Jalgaon | Jalna | Beed | Parbhani | Pune | Kolhapur | Chhatrapati Sambhajinagar | Nashik | Mumbai

Other States:
Madhya Pradesh | Chhattisgarh | Goa | Gujarat | Rajasthan | Uttar Pradesh | Uttarakhand | Haryana | Punjab | Himachal Pradesh | Delhi | Jammu & Kashmir | Ladakh | Karnataka | Kerala | Tamil Nadu | Telangana | Andhra Pradesh | Odisha | West Bengal | Bihar | Jharkhand | Assam | Arunachal Pradesh | Meghalaya | Manipur | Mizoram | Nagaland | Tripura | Sikkim

चलवादी एज्युकेशन सोसायटी
विद्यानगर,पुणे ४११०३२

दिवाळी अशी खास,
तिच्यात लक्ष्मीचा निवास...
फराळाचा सुगंधी वास,
दिव्यांची आरास...
मनाचा वाढवी उल्हास,
अशा दिवाळीच्या शुभेच्छा...
तुमच्यासाठी खास !
हि दिवाळी तुम्हा सर्वांना
सुखसमृध्दीची, भरभराटीची,
आनंदाची जावो...

दिपावली व पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा!

अँड. रेणुका चलवादी (शिर्के)
उपाध्यक्षा, पुणे इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज
सेक्रेटरी, चलवादी एजुकेशन सोसायटी

शब्दांच्या आणि भावना
यांच्या **संगमातून** घडतो **संवाद,**
आणि **संवादातून** निर्माण
होतो **विश्वासाचा दीप.**
त्या उजेडातच आम्ही दररोज
तुमचं **यश** उजळतो.

FUZION
PUBLIC RELATIONS
India's Most Trusted Regional PR Consultancy

आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला प्रकाशमय, यशमय
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

मा. श्री. गिरीश करपे 99234 08402

UCHIT Media
Service noble cause

विश्वासाचा उजेड, संवादाची दिशा!

विश्वास आणि व्यावसायिकतेच्या
बळावर मीडियाक्षेत्रात आपली ओळख
निर्माण करणारे
UCHIT MEDIA SERVICES
या **दिवाळीत** आपल्या
सर्व **सहकाऱ्यांना** आणि **ग्राहकांना** देत आहे

प्रकाशमय आणि समृद्ध
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

आपल्या सहकार्यानेच संवादाच्या
या प्रवासाला मिळते ऊर्जा आणि उजेड!

Flat 3, First Floor, Vishnu Narhar Apartment, 1468 Sadashiv Peth,
Renukaswarup School Lane, Tilak Road, Pune - 411030

9767789529 | 8329581972